रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १८४
www.ramprahar.com
◆ मंगळवार, २० जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

आगरी बोलीचे वैभव जपण्यासाठी जागर/३
माथेराननंतर चिंचवलीत शस्त्रधारी चोरांची दहशत/५
महिलांच्या कबड्डी स्पर्धेत पनवेल संघ विजेता/८

## शिवसेना पक्षचिन्हाबाबत उद्यापासून अंतिम सुनावणी



**मुंबई :** शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण पक्षचिन्हाबाबतच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात येत्या बुधवार (दि. २१)पासून अंतिम सुनावणी सुरू होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ सलग दोन दिवस अंतिम युक्तिवाद ऐकून घेणार आहे. २१ आणि २२ जानेवारी या दोन दिवसांत सलग आणि सविस्तर सुनावणी होणार असून या कालावधीत अन्य कोणतेही प्रकरण न्यायालयाच्या कार्यसूचीत समाविष्ट केले जाणार नाही, असे न्यायालयाने याआधीच स्पष्ट केले आहे. जून २०२२मध्ये एकनाथ शिंदे बंड करीत ४० आमदारांसह उद्धव ठाकरेंच्या सरकारमधून बाहेर पडले. त्यानंतर त्यांनी शिवसेना पक्ष आणि चिन्हावर दावा केला. निवडणूक आयोगानेही शिंदेंच्या बाजूने कौल दिला, पण हा संपूर्ण वाद सुप्रीम कोर्टात गेला. आता या खटल्याची अंतिम सुनावणी होणार आहे.

# नितीन नवीन भाजपचे नवे अध्यक्ष

## प्रमुख नेत्यांची उपस्थिती; आज औपचारिक घोषणा



### अशी आहे राजकीय कारकीर्द

नितीन नवीन हे स्व. नवीन सिन्हा यांचे पुत्र आहेत. त्यांच्या वडिलांनी जेपी चळवळीपासून राजकीय कारकिर्द सुरू केली. २००५मध्ये वडिलांचे निधन झाले व या मतदारसंघातील पोटनिवडणुकीत नवीन आमदार बनले. २०१६मध्ये त्यांना भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष नियुक्त करण्यात आले. ते पाच वेळा आमदार झाले व तीन वेळा मंत्रिपद भूषवले. २०२५च्या विधानसभा निवडणुकीनंतर त्यांना भाजपचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष करण्यात आले.

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भाजपचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष नितीन नवीन यांनी सोमवारी (दि. १९) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी आपला अर्ज दाखल केला. गृहमंत्री अमित शाह आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह हे त्यांचे प्रस्तावक आहेत. दरम्यान, नवीन यांच्याव्यतिरिक्त अन्य कुणाचाही अर्ज न आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. याबाबतची औपचारिक घोषणा मंगळवारी (दि. २०) होईल.

नवीन यांच्या नामांकन प्रक्रियेदरम्यान मावळते अध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय मंत्री अमित शाह, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, हरदीप सिंह पुरी यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राज्य युनिटचे अध्यक्ष, खासदार आणि इतर अधिकारीदेखील हजर होते.

भाजपचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या नावाची घोषणा सोमवारी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी भाजपच्या मुख्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदी, वरिष्ठ नेते, पदाधिकारी, आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित राहतील. १२वे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांची बिनविरोध निवड झाली आहे.



**नवी दिल्ली : भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची सोमवारी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सदिच्छा भेट घेतली. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भाजप परिवाराला मिळालेल्या नेत्रदीपक विजयानिमित्त पेढा भरवून त्यांनी चव्हाण यांचे अभिनंदन केले. सोबत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पक्षाचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे, मुंबई अध्यक्ष आमदार अमित साटम आदी.**

# रायगड जिल्हा परिषद निवडणुकीसाठी चित्रा पाटील, मानसी दळवींचा अर्ज दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी सोमवारी (दि. १९) चार जणांनी, तर स्थानिक अलिबाग पंचायत समितीसाठी एकाने आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केला.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी १६ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली. पहिल्या दिवशी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नव्हता. दुसऱ्या दिवशी जिल्हा परिषदेच्या आवास मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाचे दिलीप भोईर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.



यानंतर सोमवारी भाजपच्या चित्रा पाटील यांनी आंबेपूर जिल्हा परिषद मतदारसंघातून उमदेवारी अर्ज दाखल केला. त्यांच्यासमवेत भाजप नेते, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील उपस्थित होते. याशिवाय चेंढरे मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या सुनबाई आदिती अभिजीत दळवी, थळ मतदारसंघातून आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी मानसी दळवी, तर काविर मतदारसंघातून शिवसेनेचे अलिबाग तालुकाप्रमुख अनंत गोंधळी यांनी अर्ज भरले.

शिवसेनेच्या तीनही उमेदवारांचे अर्ज दाखल करताना आमदार महेंद्र दळवी, दिलीप भोईर उपस्थित होते. काविर पंचायत समिती गणातून शिवसेनेचे संतोष निगडे यांनी उमदेवारी अर्ज दाखल केला. अर्ज भरण्याची अंतिम तारीख २१ जानेवारी आहे.

## काशीद समुद्रात बुडून पर्यटकाचा मृत्यू

**मुरूड : प्रतिनिधी**

पुणे हडपसर येथील एका पर्यटकाचा मुरूड तालुक्यातील काशीद समुद्रात बुडून मृत्यू झाल्याची



घटना रविवारी (दि.१८) घडली. सोमनाथ राजेश भोसले (वय २४) असे मृत पर्यटकाचे नाव असून तो मित्रांसमवेत फिरायला आला होता.

पुण्यातील मित्रांचा ग्रुप रविवारी दुपारी काशीद समुद्रात पोहण्यास गेला होता. यातील सोमनाथ भोसलेला पाण्याचा अंदाज न आल्याने तो खोल समुद्रात खेचला गेले. मित्रांनी त्यांचा शोध घेतला, मात्र तो सापडत नसल्याने त्यांनी मुरूड पोलीस ठाण्यात मिसिंग केस दाखल करण्यात आली. दरम्यान, अखेर सायंकाळी सोमनाथचा मृतदेह आढळून आला. याबाबत मुरूड पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## राज्यातील २९ महापौरपदांच्या आरक्षणाची गुरुवारी सोडत

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौरपदांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी येत्या गुरुवारी (दि. २२) मंत्रालयात सोडत काढली जाणार आहे. या संदर्भात नगरविकास विभागाने पत्र जारी केले आहे.

महापौरपदांच्या आरक्षणाची सोडत २२ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता मुंबई येथे मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या महत्त्वाच्या प्रक्रियेचे अध्यक्षपद नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ भूषवणार आहेत. आरक्षण निश्चित झाल्यानंतर विविध महापालिकांमध्ये महापौर निवडीची प्रक्रिया सुरू होईल आणि सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग येईल.

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीमध्ये बहुतांश ठिकाणी भाजपसह सत्ताधारी महायुतीने घवघवीत यश मिळविले आहे. त्यानंतर आता कोणत्या प्रवर्गाचा महापौर कोणत्या महापालिकेमध्ये बसणार हे २२ जानेवारीला निश्चित होईल.

## निवडक

### चांदीच्या दराने ओलांडला तीन लाख रुपयांचा टप्पा

**मुंबई :** येथील सराफा बाजारात चांदीच्या किमतीने सोमवारी (दि. १९) किलोमागे तीन लाख रुपयांचा टप्पा ओलांडला. त्यामुळे करांसह एक किलो चांदीसाठी सुमारे तीन लाख दोन हजार ५०० रुपये मोजावे लागत आहेत. अवघ्या पाच आठवड्यांमध्ये चांदी किलोमागे एक लाख रुपयांनी महाग झाली आहे. सोनेही तोळ्यामागे सव्वादोन हजार रुपयांनी महाग झाले. २४ कॅरेट सोन्याचे दर एक लाख ४८ हजार रुपये तोळा, तर २२ कॅरेट सोन्याचे दर एक लाख ४४ हजार रुपये तोळ्यापेक्षा जास्त झाले आहेत.

### भारताचा आर्थिक वाढीचा दर यंदा ७.३ टक्के राहण्याचा अंदाज

**नवी दिल्ली :** भारतात चालू आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत सर्व क्षेत्रातील कामगिरी मजबूत होत असल्याने यंदा आर्थिक वाढीचा दर ७.३ टक्के राहील, असा अंदाज नाणेनिधीने वर्तवला आहे. सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था भारताची असेल, असेही नाणेनिधीने प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे.

## वसईच्या समुद्रात रहस्यमय रिंगण

**वसई : प्रतिनिधी**

वसईजवळच्या समुद्रात एक विचित्र प्रकार समोर आला आहे. येथील समुद्रामध्ये रहस्यमय गोल रिंगण तयार झाल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील दीड आठवड्यांपासून हा प्रकार समुद्रात सुरु असून यामागील गूढ अजूनही उलगडलेले नाही.



मिळालेल्या माहितीनुसार समुद्रात ६६ नॉटिकलवर अंतरावर गोल रिंगण तयार झाल्याचे दिसून आले आहे. मासेमारी करून किनाऱ्याकडे परत येताना वसईच्या स्थानिक मच्छीमारांना हे रिंगण दिसले. याची माहिती मत्स्य अधिकाऱ्यांना दिल्यानंतर याबाबत तटरक्षक दल आणि नौदलाला कळवण्यात आले आहे.

समुद्रातील इतर ठिकाणचे पाणी शांत असतानाच या ठराविक वर्तुळामध्येच पाणी असे रहस्यमयरित्या का हालचाल करत आहे? याचे कारण अद्याप स्पष्ट झालेलश नाही, मात्र मच्छीमार बांधवांकडून या ठिकाणी पाण्याखाली ज्वालामुखी असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

पालघर जिल्हा हा भूकंपप्रवण क्षेत्र आहे. दरवर्षी इथं दोनशेहून अधिक सौम्य भूकंप होतात. म्हणून आपत्ती विभागाकडूनही तपासणी करावी अशी मागणी समुद्र जीव रक्षक जनार्दन मेहेर यांनी केली आहे.








## अभिनंदन!

**पनवेल : येथील महापालिकेच्या निवडणुकीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीने घवघवीत यश संपादन केले. या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून विविध स्तरांतून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भाजप नेते अशोक मोटे, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांची भेट घेऊन अभिनंदन केले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नवनिर्वाचित नगरसेवक रवींद्र भगत यांचे विशेष कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# पनवेलमध्ये रंगला पंतग महोत्सव

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिल्या शुभेच्छा





(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय सण आणि उत्सवांची समृद्ध परंपरा जोपासण्याच्या उद्देशाने पनवेलमधील एमसीसीएच सोसायटी मैदानावर रविवारी (दि. १८) पतंग महोत्सवाचे शानदार आयोजन करण्यात आले होते. मकरसंक्रांतीचे औचित्य साधून सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते आणि शकुंतला रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी या महोत्सवाला भेट देत शुभेच्छा दिल्या.

महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे आकाशात सोडलेले रंगीबेरंगी लँटर्न, ज्यांनी रात्रीचे आकाश उजळून निघाले. महोत्सवाला भाजपचे जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेवक नितीन पाटील, उपाध्यक्ष गणेश कडू, नगरसेवक राजू सोनी, अजय बहिरा, सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक अनिल भगत, उद्योजक राजू गुप्ते, पवन सोनी, विलास कोठारी, संजय पोतदार, प्रशांत पोतदार, शहर सरचिटणीस रूपेश नागवेकर, संजय मुणोत, उल्हास झुंझारराव, प्रशांत झुंजारराव, जितेंद्र झुंझारराव, वर्षा ठाकूर, प्रवीण मोरबाळे, आदित्य देशमुख, अमेय देशमुख, संदीप पाटील, प्रशांत शेटे, स्वरूप वाणी, संतोष कुंवर यांच्यासह पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा पतंग महोत्सव परंपरेचा वारसा जपणारा आणि सामाजिक जवळीक साधणारा एक अविस्मरणीय सोहळा ठरला.

या वेळी महोत्सवाचे आयोजक नगरसेवक सुमित झुंझारराव यांनी उपस्थितांशी संवाद साधून आपल्या भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी आता त्यांना हक्काचा माणूस मिळाला असून जनसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण सदैव तत्पर राहणार असल्याची ग्वाही दिली.

# राष्ट्र सेविका समितीचे सघोष संचलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्र सर्वोपरी हे ब्रीद घेऊन आणि सुखमय सुसंघटित समाज निर्मितीचे उद्दिष्ट समोर ठेवून गेली नऊ दशके राष्ट्र सेविका समिती कार्यरत आहे. याच उद्दिष्टाचा एक भाग म्हणजे संघटितपणे शिस्तबद्ध पद्धतीने केलेले सघोष संचलन. मकरसंक्रांतीच्या निमित्ताने आयोजित केले जाणारे संचलन यंदा पनवेल येथे रविवारी (दि. १८) आयोजित करण्यात आले होते.




पनवेल शहरातील नूतन गुजराती विद्यालयाच्या प्रांगणात सघोष संचलनाला सुरुवात करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा, विसावा हॉटेल, ज्योती आहार भवन, हनुमान मंदिर, सीकेपी हॉल, विरूपाक्ष मंदिर, कर्मवीर भाऊराव पाटील स्मारक, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक या मार्गाने हे संचलन पुन्हा गुजराती शाळेत परतले. यामध्ये पेण, पनवेल, खालापूर आणि उरण या चार तालुक्यांचा सहभाग होता. एकूण १७९ सेविका आणि जवळपास १०० नागरिक, संघ बंधू यांनीदेखील या संचलनाला हजेरी लावली.

सघोष संचलनाला राष्ट्र सेविका समितीच्या कोकण प्रांत व्यवस्था प्रमुख कांचन पंडित उपस्थित होत्या तसेच रायगड जिल्हा पालक मंजूषा शेंडे, जिल्हा व्यवस्था प्रमुख मंजुषा भावे, जिल्हा सहव्यवस्था प्रमुख विजया औंधेकर, जिल्हा पर्यावरण गतिविधी प्रमुख ज्योती कानिटकर असा अधिकारीवर्गही हजर होता.

नेत्रतज्ज्ञ संगीता जोशी यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी संचलनाला शुभेच्छा दिल्या. (पान २ वर..)

# तिसऱ्या दिवशी नामनिर्देशन पत्र 'निरंक'च

## प्रत्येक रकान्यात 'निरंक' नसल्याने पोलादपूर तालुक्यात नव्या ॲफिडेव्हीटची मागणी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

अतिशय काटेकोरपणे पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र तपासले गेल्याने ज्या सलग सर्व रकान्यामध्ये निरंक असा स्वतंत्र उल्लेख करण्याऐवजी वरीलप्रमाणे किंवा सर्व रकान्यासाठी निरंक असा उल्लेख ऍफिडेव्हिटमध्ये करण्यात आल्याने नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी गेलेल्या उमेदवारांस परतीचा रस्ता दाखविण्यात आला. यामुळे तिसऱ्या दिवशीही पोलादपूर तालुक्यात नामनिर्देशनपत्र दाखल करणाऱ्या उमेदवारांची संख्या 'निरंक'च राहिली आहे. मंगळवार आणि बुधवारी शेवटचे दोन दिवस असल्याने उमेदवारांची नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी तुंबळ गर्दी उसळण्याची चिन्हे दिसत आहेत.





पोलादपूर तहसिल कार्यालयामध्ये नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या चौथ्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी मुंबईतील उपजिल्हाधिकारी श्रीमती मिनाक्षी राठोड या सोमवारपासून रूजू झाल्या आहेत. पोलादपूर तहसिलदार कपिल घोरपडे यांनी छाननी कक्षामध्ये सहकाऱ्यांसोबत उमेदवारांचे अर्ज परिपूर्ण असल्याची खातरजमा करण्यासाठी सुरूवात केली आहे. दरम्यान, पोलादपूर तहसिल कार्यालयामधून सोमवारी दुपारपर्यंत नामनिर्देशनपत्रे २५ नेण्यात आल्याने आतापर्यंत नामनिर्देशनपत्रं ७१ नेण्यात आली आहेत.

नामनिर्देशनपत्र ऑफलाईन स्विकारण्यात येत असल्याने त्यामुळे छाननीप्रक्रिया अर्ज दाखल करण्यापूर्वी देखील करण्यात येत आहे. आज आणि उद्या त्याच नोटरी ॲफीडेव्हीट अर्जावर तशाच प्रकारचे सर्व रकान्यांमध्ये 'निरंक' न लिहिल्याने पुन्हा नव्याने ॲफिडेव्हिट करण्यास सांगितल्यास अनेक उमेदवार नामनिर्देशनपत्र दाखल करू न शकल्याने निवडणूकीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे अथवा तशाप्रकारे सर्व रकान्यांवर रेष मारून एकाच ठिकाणी तिरक्या अक्षरात 'निरंक' लिहिलेलेॲफिडेव्हीट स्विकारले गेल्यास सोमवारी उमेदवारांना या मुद्दयाने परत का पाठविण्यात आले, याबाबत शंका उपस्थित होण्याची शक्यता आहे. यामुळे गोंधळाची परिस्थिती उदभवू शकणार आहे.

यापूर्वीच्या प्रत्येक निवडणुकीवेळी उमेदवारांना शक्तीप्रदर्शन करून तहसिल कार्यालयाच्या प्रांगणात जाण्याची मुभा असे मात्र या निवडणुककाळात तहसिल कार्यालयाच्या रस्त्याच्या प्रारंभीच पोलीस बंदोबस्त ठेऊन नियंत्रण ठेवण्यात आल्याने नगरपंचायत आणि भूमीअभिलेख कार्यालय तसेच बॉण्डरायटर कार्यालयामध्ये जाणाऱ्या अभ्यागतांनाही प्रतिबंध केला जात असल्याचे दिसून येत आहे. कार्यकर्ते, उमेदवार आणि पत्रकारांना त्यांच्या वाहन पार्किंगसाठी तहसिल कार्यालयाचा परिसर प्रतिबंधित करण्यात आला असून उमेदवार आणि त्यांच्या राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनादेखील उमेदवारांसोबत तहसिल कार्यालयाच्या परिसरात पाचपेक्षा अधिक संख्येने जाण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

दरम्यान, अनेक उमेदवारांना जात प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र समितीकडे अर्ज केल्याची पावती, थकबाकीदार नसल्याच प्रमाणपत्र, विवाहित महिलांच्या बाबतीत दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच असल्याचे प्रतिज्ञापत्र अथवा राजपत्र, शौचालय असल्याचे प्रमाणपत्र, बँकेत निवडणुकीसाठी नवीन खाते उघडून पासबुकाची सत्यपत्र, अनामत रक्कम पावती, उमेदवाराचे ओळखपत्र, वयाचा पुरावा, विहित मुदतीत खर्च सादर करण्याचे हमीपत्र तसेच १ सूचक अशा कागदोपत्री पूर्ततेसाठी उमेदवारांना अतिशय कमी वेळ मिळाला आहे. त्यामुळे नामनिर्देशन पत्रांची मोठया संख्येने विक्री होऊनही यापुढील शिल्लक दोन दिवसांत दररोज ११ ते ३ वाजेपर्यंतच्या चार तासांमध्ये नामनिर्देशन पत्र दाखल होण्याची प्रक्रिया पूर्ण होण्याबाबत प्रचंड तणावाची परिस्थिती निर्माण होणार आहे.

# आगामी काळात राष्ट्रवादी अधिक मजबूत होईल -मंत्री आदिती तटकरे

## राजीव साबळे, अस्लम राऊत यांचे उमेदवारी अर्ज दाखल





**माणगाव : प्रतिनिधी**

आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक सक्षम आणि मजबूत होईल. विविध पक्षांतील नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करतील. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुन्हा एकदा सर्वाधिक जागा जिंकून अग्रस्थान राखेल, असा ठाम विश्वास महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

माणगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार ॲड. राजीव साबळे आणि अस्लम राऊत यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले, त्या वेळी आयोजित जाहीर सभेत त्या बोलत होत्या. त्यांच्या भाषणातून पक्षातील संघटनात्मक ताकद, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि आगामी निवडणुकीतील सकारात्मक वातावरण स्पष्टपणे दिसून आले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते व कोकण विभागीय संघटक ॲड. राजीव साबळे यांनी निजामपूर जिल्हा परिषद मतदारसंघातून, तर अस्लम राऊत यांनी मोरबा जिल्हा परिषद मतदारसंघातून आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. पंचायत समिती मतदार संघात अलका केकाणे, संजोग मानकर, गणेश पवार यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक उपस्थित होते.उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने माणगाव शहरात भव्य प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. हॉटेल आनंद भवन येथून तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या रॅलीत मोठ्या प्रमाणात शक्तीप्रदर्शन करण्यात आले. ढोल–ताशे, घोषणा आणि उत्स्फूर्त प्रतिसादामुळे संपूर्ण माणगाव शहर राष्ट्रवादीच्या घोषणांनी दणाणून गेले होते.

विशेष म्हणजे या रॅलीमध्ये महिलांची लक्षणीय उपस्थिती दिसून आली. दरम्यान, शिवसेनेतर्फे रमेश मोरे यांनी मोरबा तर अविनाश नलावडे यांनी निजामपूर जिल्हा परिषद मतदारसंघातून आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. मात्र त्यांनी कोणतीही प्रचार रॅली न काढता थेट संबंधित कार्यालयात जाऊन अर्ज दाखल केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

# स्वच्छ, मुबलक पाणी पुरवणे आमची जबाबदारी -उपनगराध्यक्ष विक्रम साबळे





**खोपोली : प्रतिनिधी**

नवनर्वाचित उपनगराध्यक्ष विक्रम यशवंत साबळे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर तातडीने पाणी पुरवठा अधिकाऱ्यांशी चर्चा करून संबंधित खात्याची माहिती घेतली. तसेच घटनास्थळी जाऊन पाहणी केली. पाईपलाईन मध्ये सांडपाणी जात असल्याचे निदर्शनास येताच त्यावर तत्काल उपाय योजना करण्याचे अधिकाऱ्यांना आदेश दिले.

उपनगराध्यक्ष साबळे यांनी नाले, डॅनेज, शंकर मंदिर येथील तलाव, पाणी फिल्टर प्लांटची माहिती घेतली आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश दिले. त्यांनी सांगितले की, पाणी पुरवठा आणि स्वच्छता यावर विशेष लक्ष देण्यात येईल, याबाबत अधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी अशी सुचविणे. स्वच्छ व फिल्टर युक्त पिण्याचे पाणी देणे आपली जबाबदारी असल्याचे पण त्यांनी यावेळी बोलताना सांगितले

उपनगराध्यक्ष साबळे यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले की, पाईपलाईन मध्ये सांडपाणी जात असल्याचे निदर्शनास येताच तत्काल उपाय योजना करण्यात यावी. त्यांनी सांगितले की, पाणी पुरवठा व्यवस्थेत कोणतीही गडबड होऊ नये याची काळजी घ्यावी.

# रोह्यात घोसाळे जि.प. गटातून भाजपच्या सुश्रुता पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती राजकीय रणधुमाळी सुरू झाली असून या राजकीय रणधुमाळीत जिल्हा परिषद निवडणुकीसाठी पहिला उमेदवार अर्ज दाखल झाला आहे. रोह्यात घोसाळे जिल्हा परिषद गटासाठी भाजपच्या सुश्रुता सुभाष पाटील यांनी निवडणूक निर्णय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

यावेळी माजी आमदार .पंडीतशेठ पाटील, भाजप तालुका अध्यक्ष महेश ठाकूर, भाजप नेते बबलु सय्यद, राजेश सानप, जितेंद्र जोशी, अतुल पाटील, माजी शहर प्रमुख यज्ञेश भांड, नंदेश यादव, लियाकत खोत, उमेश शेडगे आदी उपस्थित होते.



# तळा तालुक्यात अद्याप एकही उमेदवारी अर्ज दाखल नाही

**तळा : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून उमेदवारी अर्ज भरण्यास १६ जानेवारी पासून सुरूवात झाली आहे.मात्र आजपर्यंत १९ जानेवारी पर्यंत एकाही उमेदवाराचा अर्ज दाखल झाला नाही.आता फक्त दोन दिवस शिल्लक राहिले आहेत.

तळा तालुक्यातील शिवसेना शिंदेगट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट,भाजपा,कॉंग्रेस,शिवसेना ठाकरे गट इत्यादी पक्ष असून कोणत्याही पक्षाने एकही उमेदवारी अर्ज भरला नाही तसेच कोणताही अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही. आता फक्त दोन दिवस उरले आहेत.

पक्षप्रमुखांसमोर इच्छुक उमेदवारांची संख्या अधिक असल्याने कोणाला उमेदवारी देण्यात येईल हे काही सांगता येत नाही मात्र इच्छूक आपल्यालाच उमेदवारी कशी मिळेल यासाठी प्रयत्न करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.तसेच शेवटी कोणत्या पक्षांची युती होतोय हेही महत्वाचे आहे.

# पद्मदुर्ग किल्ल्यात शौर्यगाथा ऐतिहासिक संमेलन; शेकडो शिवप्रेमींची उपस्थिती

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड समुद्रकिनारा पासून तीन किलोमीटर अंतरावर अरबी समुद्रात राजे शिवछत्रपती महाराजा व शंभुराजे आणि जिगरबाज मावळयांनी पद्मदुर्ग किल्ल्याची निर्मिती केली होती आज ३५० वर्ष पूर्ण होत असुन या निमित्त मुरुड येथील पद्मदुर्ग शौर्यगाथा ऐतिहासिक संमेलन शिवप्रेमी मंच यांनी पद्मदुर्ग किल्ल्यात शौर्यगाथा ऐतिहासिक संमेलन आयोजन करण्यात आले होते.हे ऐतिहासिक संमेलन शेकडो शिवप्रेमींच्या उपस्थित संपन्न झाला.



यावेळी इतिहास अभ्यासक आप्पासाहेब परब, सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे वंशज विक्रमसिंह मोहिते,पद्मदुर्ग आरमार अधिकारी लायजी सरपाटील यांचे वंशज निलेश सरपाटील,शिवाजी स्मारक मंडळाचे कार्यावाह सुधीर थोरात, प्रवेश पालशेतकर, अनिकेत पाटील,अतुल मोरे,पंकज भोसले,सिध्देश पुलेकर, अश्विन विरकुड, विरेंद्र गायकर,श्वेता पालशेतकर,गौतमी पानवलकर आदिंसह महिलांसह शिवप्रेमी, शालेय व महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी शिवप्रेमींनी गडाला फुलांच्या माळांनी व भगव्या झेंडे लावुन किल्ला भगवेमय झाले होते.प्रथम श्री कोटेश्वरी देवीची पुजा श्वेता पालशेतकर व विविध महिलांच्या शुभ हस्ते देवीची ओटी भरुन पुजा करण्यात आली तद्नंतर पद्मदुर्ग उभारणीच्या वेळी उभारण्यात आलेल्या मृहर्त मेढीच्या खांबाला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी ओंकार शाळा, मुरूड नगरपरिषद शाळा व सर एस ए हायस्कूलच्या ४२ विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत सहभागी नोंदवुन पद्मदुर्ग किल्ला चे चित्र काढुन शिवरायांना मानवंदना देण्यात आली. यावेळी चित्रकार महेंद्र पाटील यांनी श्री शिवछत्रपतींची पाण्यात काढलेली रांगोळी विशेष आकर्षण ठरली.

इतिहास अभ्यासक अनिकेत पाटील यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना गडाची व आतील वास्तुंची माहिती सांगण्यात आली. पद्मदुर्गाचे ऐतिहासिक महत्व व इतिहास सर्वसामान्य पर्यटकांपर्यंत पोहोचवणे तसेच सामान्य नागरिकांनी पद्मदुर्गचा इतिहास सांगून पोहोचवून रोजगार निर्मितीव्हावी याकरिता गाईड प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. अशी माहिती अनिकेत पाटील यांनी दिली.

इतिहास तपस्वी आप्पा परब यांनी भारताच्या वैभवशाली इतिहास,परकीय आक्रमण आणि राजे शिवछत्रपती महाराजांचा विजयी पराक्रमाचा इतिहास सांगण्यात आला. अतुल मोरे यांनी सुजाण ट्रेकर आणि सुरक्षित भटकंती या संदर्भात मार्गदर्शन केले. दुर्गसंवर्धक आणि इतिहास विषयात मौल्यवान कामगिरी करणाऱ्या शिवप्रेमी आणि संस्थांचा सत्कार आप्पा परब,पंकज भोसले,सुधीर थोरात,विक्रम सिंह मोहिते व निलेश सरपाटील यांच्या शुभ हस्ते मानपत्र देऊन सन्मानित केले.

# खोपोलीत स्वराज मित्र मंडळातर्फे वक्तृत्व स्पर्धा

**खोपोली :**

स्वराज मित्र मंडळ खोपोली तर्फे प्रजासत्ताक दिन आणि मंडळाच्या १७ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. चार गटांमध्ये स्पर्धा होणार आहे. पहिली ते चौथी, पाचवी ते सातवी ह्या दोन गटातील स्पर्धकांना तीन मिनिटांची वेळ मिळणार असून आठवी ते दहावी गटातील स्पर्धकाला चार मिनिट आपले वक्तृत्व कला सादर करण्यासाठी वेळ मिळणार आहे .खुल्या गटासाठी हीच वेळ पाच मिनिटांची ठेवण्यात आली आहे. २६ जानेवारी रोजी सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत मोगल वाडी नगरपरिषद शाळा क्रमांक सहा या ठिकाणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रोख रक्कम सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र असं बक्षीस आता स्वरूप असणार आहे

# निजामपूर विभागातील राष्ट्रवादीचे प्रसाद गुरव शिवसेनेत



**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेत पक्षप्रवेशांची मालिका वेगाने सुरू असून, निजामपूर विभागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आहे. निजामपूर विभागातील राष्ट्रवादीचे प्रसाद अनंत गुरव यांनी दीपक चांदोरकर, सुरेश शिवदे यांच्या समवेत शिवसेना नेते तथा मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

मंत्री भरत शेठ गोगावले यांच्या विकासाभिमुख व जनहितकारी कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत तसेच निजामपूर विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस नेतृत्वाची गरज असल्याने प्रसाद गुरव यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला रामराम ठोकत शिवसेनेचा झेंडा हाती घेतला.

या पक्षप्रवेशामुळे निजामपूर विभागात शिवसेनेची ताकद लक्षणीयरीत्या वाढली असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेला मोठे बळ मिळाले आहे. या पक्षप्रवेश समारंभावेळी निजामपूर विभागातील आणि माणगाव तालुक्यातील शिवसेना युवा सेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.

पान १ वरुन

# राष्ट्र सेविका समितीचे सघोष संचलन

कांचन पंडित यांनी त्यांच्या उद्बोधनात राष्ट्र सेविका समितीच्या ९० वर्षांच्या वाटचालीचा उल्लेख करून कोकण प्रांतातील शाखांच्या प्रगतीची माहिती दिली. हे देशातील महिलांचे सर्वात मोठे व जुने संघटन असून आपण राष्ट्र निर्मितीसाठी समाजातील चुकीच्या पद्धती दुरूस्त करून आपल्या आचरणातून नवा आदर्श समाज समोर ठेवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

राष्ट्र सर्वोपरी हा भाव सर्व कुटुंबांमध्ये जागृत होणे आवश्यक आहे. ज्या प्रमाणे शरीर विविध अवयवांना एकत्र घेऊन काम करते. त्या प्रमाणे समितीने सर्व समाज घटकांना एकत्र घेऊन काम करायचे आहे, असेही पंडित यांनी नमूद केले. वंदे मातरम्‌ने संचलनाची सांगता झाली.

# इनरव्हिल क्लब खोपोली तर्फे १० जानेवारी हा इनरव्हिल डे साजरा

**खोपोली : प्रतिनिधी**

इनरव्हिल क्लब खोपोली तर्फे १० जानेवारी हा इनरव्हिल डे सर्व ठिकाणी साजरा केला जातो त्या निमित्ताने इनरव्हिल क्लब खोपोली तर्फे गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूल मध्ये गायन व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या यावेळी जनता विद्यालय खोपोली,ज्युनियर कॉलेज, आनंदशाला ज्युनियर कॉलेज, के एम सी कॉलेज व गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलच्या एकूण २० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता

विजयी स्पर्धकांना ट्रॉफी देण्यात आली व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना पेन देण्यात आले. गगनगिरी महाराज ज्युनियर कॉलेजचे व्हाइस प्रिन्सिपॉल शाझमीन मॅम, स्कूल कोर्डिनेटर जोशी मॅडम, क्लब अध्यक्ष दिना शहा,सेक्रेटरी मधुमिता पाटील मॅडम प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. क्लब तर्फे वक्तृत्व स्पर्धेचे काम माजी अध्यक्षा सारिका धोत्रे आणि सदस्य विनया हर्डीकर यांनी पाहिले तर, गायन स्पर्धे चे काम क्लबच्या सदस्य निशा दळवीजी आणि ज्योती शिंदेजी यांनी केले.

या कार्यक्रमा साठी जनता कॉलेजचे सर, आनंदशाळा कॉलेज च्या मॅडम व इतर इनरव्हील सदस्य उपस्थित होत्या.



# राष्ट्रीय संघर्ष समिती रायगडच्यावतीने रोह्यात पेन्शनरांचा मेळावा

**रोहे : प्रतिनिधी**

राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोकराव राऊत यांच्या निर्देशानुसार रविवारी ( १८ जानेवारी ) भाटे वाचनालय, सभागृहात पेन्शनरांचा मेळावा उत्साहात संपन्न झाला आहे.मेळाव्यात ६५० चे वर पेन्शन धारकांनी सहभाग घेतला होता.

यावेळी महादेव धसाडे यांनी संघटनेचे कार्य , वाटचाल व पेन्शन वाढीसाठी कमांडर साहेबांचे प्रयत्न याबाबत सविस्तर माहिती देवून इतरांच्या भुलथापांना बळी न पडता कमांडर साहेबांचे पाठिशी एकजूटीने उभे राहण्याचे आवाहन केले प्रास्ताविक व स्वागत तालुकाध्यक्ष मालू पाबरेकर यांनी केले. दिलीपराव कहाणे, ईंद्रसिंग अप्पा राजपूत व ी सुभाषराव पोखरकर यांनी मार्गदर्शन केले.

मेळावा यशस्वीतेसाठी मालू पाबरेकर, सुरेश कटारिया,नंदकुमार भादेकर सुरेन्द्र आगरकर, देवराम कर्णेकर, आत्माराम ठमके, नारायण पिंगळे, दगडू बामुगडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## दुखवटा वामन पाटील

**अलिबाग :** ज्येष्ठ प्रसिध्द छायाचित्रकार वामन पाटील यांचे वृध्दापकाळानेसोमवारी निधन झाले. निधनासमयी ते ८९ वर्षाचे होते.त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.



वामन पाटील यांनी अलिबागसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात छायाचित्रकार म्हणून स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली होती. जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने त्यांनी त्या वेळी जिल्ह्यात फोटोग्राफी केली होती.

# बनावट मद्यप्रकरणी दोघांवर कारवाई

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य उत्पादन शुल्क पनवेल शहर विभाग यांनी बनावट मद्य विक्री करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एकूण ७८ हजार रुपयांचा मद्य जप्त करण्यात आला.



राज्य उत्पादन शुल्क पनवेल शहर विभाग, निरीक्षक यांना १६ जानेवारी रोजी रात्री साडेआठच्या सुमारास खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात दोन इसम बनावट विदेशी मद्यची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्या ठिकाणी सापळा रचण्यात आला. यावेळी खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात दोन संशयित इसम प्रवासी बॅगा खांद्यावर घेऊन जात असताना त्यांची तपासणी केली या बॅगमध्ये बनावट विदेशी मद्य सापडून आले. ते मद्य वसई वरून आणले असल्याचे त्यांनी सांगितले.

यानुसार वसई येथील आरोपीच्या घरी छापा टाकला असता बनावट मद्यने बॉटलिंग केलेल्या बाटल्या, गोवा राज्य निर्मित आणि विक्रीसाठी आणलेल्या विदेशी मद्याच्या रिकाम्या प्लास्टिक बाटल्या, दादरा नगर हवेली निर्मित आणि विक्रीसाठी असणाऱ्या विदेशी मद्याच्या रिकाम्या काचेच्या बाटल्या आणि इतर बाटल्या जप्त करण्यात आल्या. असा एकूण ७८ हजार १८८ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## पनवेल येथील रॅलीमध्ये सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

विजयी झालेल्या नगरसेवकांच्या रॅली दरम्यान तिघा जणांच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि मणी मंगळसूत्र चोरीला गेल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

जय चंद्रन के वासू हे सेक्टर १२, नवीन पनवेल या ठिकाणी राहत असून व्हीके हायस्कूल, पनवेल येथे मतमोजणीच्या ठिकाणी आले होते. उमेदवार निवडून आल्याने प्रभागातील लोकांनी वडाळे तलाव या ठिकाणी रॅली काढली. रॅली चालू असताना त्यांच्या गळ्यातील तीन तोळ्याची सोन्याची चैन गळ्यामध्ये मिळून आली नाही. रॅलीमध्ये शोध घेतला मात्र ती सापडली नाही. याच दरम्यान रॅलीमध्ये त्यांच्यासोबत असणाऱ्या शैला चनवीर यांच्या गळ्यातील एक तोळे वजनाची सोन्याचे मणी मंगळसूत्र चोरीला गेले. तसेच निलेश पगारे यांच्या गळ्यातील एक तोळ्याची सोन्याची चैन चोरीला गेली.

## पनवेलमध्ये भटक्या कुत्र्यांच्या समर्थनार्थ साखळी आंदोलन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील पेशवेकालीन वडाळे सरोवर परिसरात भटक्या कुत्र्यांना उचलण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या निषेधार्थ विविध सामाजिक संस्थांच्या वतीने साखळी आंदोलन करण्यात आले.



'रस्ते सर्वांसाठी आहेत, भटक्या कुत्र्यांसाठीही आहेत' असा संदेश देत आंदोलनकर्त्यांनी भटक्या प्राण्यांच्या हक्कांसाठी आपली भूमिका ठामपणे मांडली. या आंदोलनात प्राणीप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत शांततामय मार्गाने निषेध व्यक्त केला. भटक्या कुत्र्यांना हटविण्याऐवजी त्यांचे लसीकरण, निर्बिजीकरण आणि, पुनर्वसन करण्यावर भर देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

# आगरी बोलीचे वैभव जपण्यासाठी सीकेटी महाविद्यालयात 'बोलींचा जागर'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'बोलीभाषांचे जतन व संवर्धन ही काळाची गरज असून आगरी बोलीचे वैभव जपण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि भाषा संचालनालय अत्यंत स्तुत्य उपक्रम राबवत आहे' , असे प्रतिपादन चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य मा. प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी केले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र शासन व मराठी भाषा संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याच्या उद्देशाने 'बोलींचा जागर' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सोमवारी (दि. १९ जानेवारी २०२६) उत्साहात संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनालयाच्या वतीने दरवर्षी १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. याचेच औचित्य साधून रायगड जिल्ह्यातील आगरी बोलीच्या संवर्धनासाठी 'आगरी बोलीचा जागर' या कार्यक्रमासाठी चांगू काना ठाकूर महाविद्यालयाची निवड करण्यात आली.



ज्ञानाची, विचारांची आणि संस्कृतीची यात्रा असणाऱ्या ग्रंथदिंडीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ग्रंथ दिंडीसाठी पनवेल परिसरातील भजनी मंडळाचा सहभाग होता. हरिनामाच्या गजरातून ग्रंथदिंडीला भक्तीचा , अध्यात्माचा आणि संत परंपरेचा सजीव स्पर्श लाभला. महाविद्यालयाच्या कला विभाग , एन एस एस आणि डी एल एल इ विभागाचे विद्यार्थी आणि महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक या दिंडीत सहभागी झाले. खांदा कॉलनी परिसरात निघालेल्या या शोभायात्रेत भजनाच्या तालावर ठेका धरत, नाचत- गात सर्व भक्तिमय वातावरणात रंगून गेले. त्यानंतर मुख्य कार्यक्रमाला प्रारंभ झाला.

यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. आगरी बोली भाषेच्या तज्ज्ञ डॉ. प्रतिमा टेंबे यांनी 'आगरी बोलीचा उगम , विकास, स्वरूप आणि वैशिष्ट्ये' स्पष्ट केली, तसेच चंद्रकांत मढवी यांनी 'आगरी बोलींचा वापर, सद्यस्थिती , जतन आणि संवर्धन' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. भाषा तज्ज्ञांनी आपल्या भाषणातून मराठीतील आगरी बोलीचे सांस्कृतिक व भाषिक महत्त्व विशद केले. यानंतर आगरी बोलीतील कविता पुंडलिक म्हात्रे, अजय भोईर, प्रकाश पाटील यांनी सादर केल्या.

आगरी बोलीतील लोकगीते अर्थात धवळे गाणाऱ्या धवळारीन श्रीमती बानुबाई ठाकूर यांचे धवळेगायन कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. बानुबाई यांनी आपल्या अनोख्या शैलीतून मुखोद्गत धवळे सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. आगरी बोलीतील नाटक याबाबत मोहन भोईर यांनी मत व्यक्त केले. हा कार्यक्रम आगरी बोलींच्या समृद्ध परंपरेचे दर्शन घडवणारा ठरला असून विद्यार्थी, परिसरातील इतर महाविद्यालयांचे प्राध्यापक व रसिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली.




**पनवेल : मनपा प्रभाग २०मधील तक्का येथील खाटिक समाजाच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेवक अजय बहिरा व माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी हनीफ ताडे, अजित ताडे, अवताब ताडे, दिलीप चवले, संतोष नावरे, रघुनाथ बहिरा आदी उपस्थित होते.**

# राज्यस्तरीय ख्याल गायन स्पर्धेत स्नेहल पाटील प्रथम

## सर्व विजेत्या स्पर्धकांचा पारितोषिक देऊन गौरव

**पनवेल : वार्ताहर**

'पनवेल कल्चरल सेंटर'तर्फे आयोजित करण्यात आलेल्या तिसाव्या राज्यस्तरीय शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धेची अंतिम फेरी नुकतीच संस्थेच्या सभागृहात पार पडली. या स्पर्धेत राज्यभरातून एकूण २४ स्पर्धकांनी भाग घेतला होता. पहिल्या फेरीसाठी स्पर्धकांकडून त्यांच्या पसंतीच्या कुठल्याही रागातील वीस मिनिटांच्या गायनाचे व्हिडिओज मागविण्यात आले होते. नंदकुमार कर्वे, मिलिंद गोखले आणि मधुरा सोहनी यांनी या गायनाचे परीक्षण करुन त्यातून ११ स्पर्धकांची निवड अंतिम फेरीसाठी केली होती.




अंतिम फेरीच्या स्पर्धेचे परीक्षण डॉ. राम नेने आणि डॉ. अनया थत्ते यांनी केले. स्पर्धेनंतर स्पर्धकांना मार्गदर्शन करताना डॉ. राम नेने म्हणाले 'अंतिम फेरीतील सर्वच स्पर्धक तयारीचे होते. आता व्यावसायिक गायक होण्याकडे तुमची वाटचाल सुरू व्हायला हवी ! गाणं सादर करताना तुम्ही इतरांपेक्षा काय वेगळं गाता हे महत्त्वाचे आहे आणि तेच श्रोत्यांना आकर्षित करतं.

तर डॉ. अनया थत्ते म्हणाल्या, गाण्याचे दोन प्रकार आहेत एक स्वान्तसुखाय आणि दुसरे श्रोत्यांसाठी. श्रोत्यांसाठी गाताना गाण्यातून श्रोत्यांशी संवाद साधायला हवा. फक्त तालासुरात गाता येणे पुरेसे नाही, लयही अतिशय महत्त्वाची आहे. प्रत्येक रागाचं स्वतःचं एक सौंदर्य असतं ते गाण्यातून प्रगट व्हायला हवं ! तुम्हाला समजलेला राग तुम्ही श्रोत्यांसमोर कसा मांडता ते महत्वाचं आहे. गाण्याचा आनंद स्वत:ही घेतला पाहिजे आणि श्रोत्यांनाही देता आला पाहिजे. श्रोत्यांसाठी जेव्हा आपण गायन करतो तेव्हा श्रोत्यांच्या अपेक्षाही पूर्ण करण्याच्या जबाबदारीने गायन करायला हवं आणि स्पर्धेसाठी जर गायन करत असाल तर इतरांपेक्षा आपलं काहीतरी वेगळं गायनात असलं पाहिजे.

पनवेल कल्चरल सेंटरच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष मिलिंद गोखले यांनी मान्यवर परीक्षकांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले स्पर्धेतील विजेत्यांना परीक्षकांच्या हस्ते रोख रक्कम, स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्र आणि सुरेश राव यांनी संपादित केलेल्या सलिल चौधरी यांच्यावरील पुस्तकाचा समावेश असलेली पारितोषिके देण्यात आली. दहा हजार रुपयांचे शैलजा तळेकर स्मृती प्रथम पारितोषिक स्नेहल पाटील हिने पटकावले तर सात हजार रुपयांचे शुभदा मधुकर दशपुत्रे स्मृती द्वितीय पारितोषिक सिद्धार्थ गोडांबे यास मिळाले. पाच हजार रुपयांचे प्रभाकर आघारकर स्मृती तृतीय पारितोषिक निरंजन पेडगावकर यास तर चार हजार रुपयांचे विश्वास भिडे स्मृती उत्तेजनार्थ पारितोषिक मृण्मयी भिडे हिला देण्यात आले.

याशिवाय या स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी निवड झालेला सर्वात लहान स्पर्धक म्हणून अंशुल बोपर्डीकर याला तीन हजार रुपयांचे गोपाळकृष्ण राव स्मृती पारितोषिक देण्यात आले. मधुरा सोहनी यांनी स्पर्धा समिती प्रमुख म्हणून उत्तम नियोजन केले आणि त्यांना श्रीधर सप्रे, नंदकुमार कर्वे, चंद्रकांत मने, यांची उत्तम साथ लाभली.

## निलेश सोनावणे यांना दादासाहेब फाळके अवॉर्ड जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जेष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते निलेश सोनावणे यांना सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबाबद्दल दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचा दादासाहेब फाळके अवॉर्ड जाहीर झाला असून हा पुरस्कार येत्या २५ जानेवारी रोजी रवींद्र नाट्य मंदिर मुंबई येथे चित्रपट क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.



याबाबत चित्रपट युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित म्हामुणकर यांनी पत्र पाठवले आहे. नुकतीच त्यांची केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या पनवेल शहर अध्यक्षपदी निवड केली आहे.

## वसंत पंचमीनिमित्त सरस्वती महापूजा

**उरण : वार्ताहर**

सालाबाद प्रमाणे या वर्षी वसंत पंचमी उत्सव मंडळ ट्रस्ट उरण यांच्या वतीने शुक्रवार (दि. २३) रोजी उरण शहरातील देऊळवाडी येथे सरस्वती महापूजा आयोजित केली आहे. वसंत पंचमी उत्सव मंडळ ट्रस्ट उरण स्थापना २००६ साली करण्यात आले आहे, अशी माहिती वसंत पंचमी उत्सव मंडळ ट्रस्ट अध्यक्ष दिनेश जयसवाल यांनी दिली .

या वेळी सकाळी ९ ते ११.३० पर्यंत माँ सरस्वती देवीपूजा ,दुपारी २ ते ४.३० कीर्तन व भजन, सायंकाळी ५ ते ७.३० वाजता सुंदर कांड पाठ, सायंकाळी ७.३० वाजतामहाप्रसाद असे नियोजन करण्यात आले आहे.

या वेळी माहिती वसंत पंचमी उत्सव मंडळ ट्रस्टअध्यक्ष दिनेश जयसवाल,उपाध्यक्ष रंजन कुमार,महासचिव पी.टी. चव्हाण ,सचिव दिपक मिश्रा ,कोषाध्यक्षमनोज शर्मा ,सहसचिव अनिल कुमार ,सहसचिव राम चव्हाण ,संघठन मंत्री कामेश्वर शर्मा , संघठन मंत्री करणपाटील, सहसचिव रुपेश पाटील,सहसचिव राकेश रंजन,श्रीमती आशा पारेख ,अमर श्रीवास्तव ,एस .एन राय,राजेश विश्वकर्मा ,ए.के.झा ,कृष्णा शर्मा ,अरविंद यादव,संतोष प्रजापती ,हिरा सिंह ठाकूर ,पी.एन सिंह,एस.डी.जोशी ,के .एन भट्ट आदींचे सहकार्य मिळणार आहे.

## राष्ट्रीय सुरक्षा अभियान अंतर्गत पनवेलमध्ये वाहतूक नियम जनजागृतीपर स्कूल बस रॅली



**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रीय सुरक्षा अभियान २०२६ निमित्त पनवेल शहर वाहतूक शाखा, कळंबोली परिवहन विभाग, कळंबोली वाहतूक शाखा व काळज समाज मध्यवर्ती यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पनवेल रिक्षा विद्यार्थी वाहक संस्था, पनवेल यांच्या सहकार्याने जनतेमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती करण्यासाठी भव्य स्कूल व्हॅन व बस रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर रॅली खांदेश्वर शिवमंदिर, आदई तलाव, नवीन पनवेल सिग्नल, वीर सावरकर चौक ते काळज समाज हॉल, पनवेल या मार्गावरून काढण्यात आली. या रॅलीमध्ये पनवेल शहर वाहतूक शाखेची पीटर मोबाईल, पनवेल बीट मार्शल वाहन, कळंबोली वाहतूक शाखेची पीटर मोबाईल तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय कळंबोली यांची सरकारी वाहने, अधिकारी व अंमलदार सहभागी झाले होते. यासोबतच पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेच्या सुमारे ३५ ते ४० स्कूल बसेस रॅलीत सहभागी झाल्या होत्या.

वाहतूक नियम जनजागृती रॅलीची सांगता काळण समाज हॉल, पनवेल येथे करण्यात आली. त्यानंतर याच ठिकाणी वाहतूक नियम मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, पनवेल विद्यार्थी वाहक संघटनेचे चालक, उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार विक्रांत पाटील यांनी उपस्थितांना वाहतूक सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करत वाहतूक नियम पाळण्याचे आवाहन केले. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने यांनी विद्यार्थ्यांशी व पालकांशी थेट संवाद साधत वाहतूक नियम पाळण्याचे महत्त्व स्पष्ट केले. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे होणाऱ्या अपघातांचे सांख्यिकी विश्लेषण सादर करून जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमासाठी पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार अमीर मुलाणी, युवराज येळे, महेंद्रसिंग राजपूत, महेंद्र गळवी, सचिन बुधवंत आदी अंमलदार उपस्थित होते.









**पनवेल : येथील एमसीसीएच सोसायटी मैदानावर रविवारी पतंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. मकरसंक्रांतीचे औचित्य साधून सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते आणि शकुंतला ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या महोत्सवाला भेट देत शुभेच्छा दिल्या.**

## संपादकीय

# प. बंगालमध्येही परिवर्तनाचे वारे

पश्चिम बंगालमध्ये आता खऱ्या बदलाची गरज असून बंगालची जनता तृणमूल काँग्रेसच्या महाजंगलराजला कंटाळली आहे, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच काढले. पश्चिम बंगालमध्ये लवकरच विधानसभा निवडणुका जाहीर होण्याची शक्यता असून भारतीय जनता पक्षावर जसा विश्वास महाराष्ट्राने नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये दाखवला तसाच विश्वास बंगालही दाखवेल असेही मोदींनी म्हटले आहे.

**अलीकडेच बिहार विधानसभा निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित केले होते. त्यावेळी पंतप्रधान मोदी भाषणात म्हणाले होते की गंगाजी बिहारमधून वाहातच बंगालपर्यंत पोहचतात. बंगालमधील भाजपच्या विजयाचा मार्गदेखील बिहारने तयार केला आहे. त्यांचे हे वक्तव्य तेव्हा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे मानले गेले होते. बिहारच्या निवडणुकीत भाजप-जेडीयूच्या नेतृत्वाखाली एनडीएने मोठा विजय मिळवला. त्यावेळी बिहारनंतर पश्चिम बंगाल हे आपले पुढचे लक्ष्य असल्याचे भाजपने म्हटले होते. येत्या दोन-तीन महिन्यात पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होण्याची शक्यता असून यावेळी तिथे भाजपचा विजय होईल असा विश्वास पक्षाच्या अनेक नेत्यांनी व्यक्त केला आहे. पश्चिम बंगालमधील यापूर्वीची विधानसभा निवडणूक २०२१मध्ये कोरोनाच्या दुसऱ्या लाटेदरम्यान झाली होती. त्यावेळी तृणमूल काँग्रेस विजयी झाली. आता बिहारनंतर एसआयआरचा दुसरा टप्पा नऊ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये पार पडला. यात पश्चिम बंगालचा देखील समावेश आहे. ममता बॅनर्जी निवडणूक आयोगाविरोधात आता अधिक आक्रमक होतील असा अंदाज राजकीय विश्लेषकांनी तेव्हाच व्यक्त केला होता. बिहार निवडणुकीत नितीशकुमार यांना महिला मतदारांना आपली ताकद बनवण्यात यश मिळाले होते. याउलट अलीकडच्या काळात पश्चिम बंगालमध्ये महिलांवरील लैंगिक अत्याचार किंवा हिंसाचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्याविरोधात आंदोलनेदेखील झाली आहेत. या घडामोडींनंतर ममता बॅनर्जी यांचा तेथील महिला वर्गावरील प्रभाव कमी झाल्याचे सांगितले जाते. बिहारपाठोपाठ महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकांमध्येही भाजपला मोठे यश मिळाले आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई महापालिकेतही भाजपला विक्रमी जनादेश मिळाला आहे. याबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी यांनी, मुंबईत विजय साजरा होत आहे, तर काझीरंगामध्ये त्याचा जल्लोष सुरू आहे असे उद्गार काढले होते. महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांतून उमटलेला जनतेचा कौल हा स्थानिक स्वराज्य संस्थांपुरता मर्यादित नाही तर तो देशाच्या व्यापक राजकीय मन:स्थितीचा आरसा आहे. भाजपवर जसा विश्वास महाराष्ट्राने दाखवला तसाच विश्वास बंगालही दाखवेल असे मोदींनी म्हटले आहे. पश्चिम बंगालमधील राजकीय हिंसाचार व प्रशासकीय यंत्रणेचा गैरवापर अवघ्या देशाला ठाऊक आहे. ममता यांनी बांगलादेशी घुसखोरांचा वापर स्वत:ची मतपेढी वाढवण्यासाठी केला आहे. त्यामुळेच, बंगालचा बांगलादेश करण्याचा प्रयत्न सुरू आहे, अशी टीका भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रेम शुक्ला यांनी अलीकडेच मुंबईत केली. या संदर्भात ममता यांच्याकडून केल्या जाणाऱ्या कारवाया राष्ट्रीय सुरक्षेशी निगडित गंभीर बाबी ठरतात. स्वत:ला वाचवण्यासाठी ममता यांनी तपासयंत्रणांनाही आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला, मात्र न्यायालयाने तो हाणून पाडला. संविधान वाचवण्याचा त्यांचा आरडाओरडा ही प्रत्यक्षात स्वत:ची सत्ता वाचवण्यासाठीची धडपड आहे हे पश्चिम बंगालच्या जनतेपासून लपून राहिलेले नाही. पश्चिम बंगालमध्येही लोक विकास आणि विश्वासाला अर्थात भाजपला कौल देतील हे निश्चित.**

# पनवेल महानगरात भाजप महायुतीचे वर्चस्व

**खबरबात**
**समाधान पाटील**

पनवेल महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप महायुतीने अपेक्षेप्रमाणे बाजी मारली. प्रतिस्पर्धी महाविकास विकास आघाडीने सत्ताधाऱ्यांविरोधात जोरदार प्रचार करून लढत दिली, मात्र महायुतीच्या झंझावातापुढे त्यांचा निभाव लागू शकला नाही. यानिमित्ताने पनवेलच्या राजकारणातील ठाकूर परिवाराचे अढळ स्थान पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

सन २०१७मध्ये झालेल्या पनवेल महापालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत भाजपने एकहाती वर्चस्व प्रस्थापित केले होते. या वेळी भाजपने शिंदे शिवसेना, अजित पवार यांची राष्ट्रवादी आणि आरपीआयच्या साथीने सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवली आहे. एकूण ७८पैकी ५९ जागा जिंकत महायुतीने घवघवीत यश संपादन केले. यामध्ये भाजपने ५५ जागा जिंकल्या, तर शिवसेना आणि राष्ट्रवादीने प्रत्येकी दोन जागी विजय मिळवला. मागील निवडणुकीत भाजपने ५१ जागा जिंकल्या होत्या. यंदा त्यात चार जागांची भर पडली आहे.

रायगडचे भाग्यविधाते, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे निवडणूक प्रभारी म्हणून लाभलेले प्रभावी मार्गदर्शन आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या दमदार नेतृत्वाखाली भाजप महायुतीने जबरदस्त कामगिरी केली. त्याचबरोबर उरणचे आमदार व येथील निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांनीही योगदान दिले. आणखी एक विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल, तो माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचा. आमदार, खासदारांच्या मुलांनी आणि नातेवाईकांनी निवडणूक लढवू नये हा पक्षश्रेष्ठींचा आदेश येण्याच्या आधीच परेश ठाकूर यांनी आपण महापालिकेची निवडणूक लढवणार नाही असे जाहीर केले होते. कार्यकर्त्यांनी आग्रह करूनदेखील नम्रपणे नकार देत ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले, परंतु निवडणूक प्रचारात त्यांनी स्वतःला झोकून दिले. भाजप महायुतीच्या उमेदवारांसाठी या शिलेदाराने प्रचार रॅलीत सहभागी होत मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या आणि विजयाचे आवाहन केले. माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रेही सक्रिय राहिले. अशा प्रकारे अनुभवी नेते, सक्षम लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांची भरभक्कम फळी आणि कार्यकर्त्यांची फौज या जोरावर महायुतीने एकदिलाने मतदारांना साद घातली. येथील जनतेनेही विकासाच आपला कौल दिला.

दुसरीकडे महाविकास आघाडीत समन्वयाचा अभाव दिसून आला. जागावाटपावरून मतभेद, वैयक्तिक हेवेदावे, उमेदवारांची शोधाशोध, काहींची माघार, इतर पक्षात प्रवेश असे कधी नव्हे ते प्रकार घडले. महायुतीकडून केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, कॅबिनेट व राज्यमंत्री यांच्या उपस्थितीत जाहीर सभा, कार्यक्रम झाले. त्या तुलनेत महाविकास आघाडीचे मोजकेच नेते येऊन गेले. विशेष म्हणजे आघाडीतील स्थानिक पातळीवरील घटक पक्षांचे बहुतांश नेते, पदाधिकाऱ्यांनी स्वतः, घरातील सदस्य किंवा नातेवाईकांना तिकीट घेतल्याने ते आपल्याच प्रचारात व्यस्त राहिले. या साऱ्याची परिणती आघाडीच्या दारूण पराभवात झाली. शेकापचे अवघे नऊ उमेदवार निवडून आले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने पाच जागी विजय मिळवला, तर काँग्रेसच्या वाट्याला चार जागा आल्या. गेल्या निवडणुकीत शेकापचे २३ नगरसेवक निवडून आले होते. या वेळी त्यांना नऊच जागा मिळाल्या. म्हणजेच त्यांच्या १४ जागा घटल्या. ही पीछेहाट शेकापला आत्मचिंतन करायला लावणारी आहे.

महापालिकेनंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात प्रचाराचा धुरळा उडणार आहे. या निमित्ताने पुन्हा एकदा महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगणार आहे.

# कादंबरीकार, निबंधकार आणि सुधारक काशीबाई कानिटकर



काशीबाई कानिटकर म्हणजे आधुनिक मराठी साहित्यातील आद्यलेखिका. आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरी, चरित्र आणि कथा या साहित्यप्रकाराचे महिला म्हणून प्रथमता लेखन केले आहे. काशीबाई या पंढरपूरचे कृष्णराव बापट यांच्या कन्या. त्यांचा जन्म २० जानेवारी १८६१ रोजी सातारा जवळील अष्टे या गावी झाला. त्यांच्या दोन भावांना शिकवायला पंतोजी येत, ते ऐकून, बघून त्या माहेरीच लिहायला शिकल्या. त्या काळात स्त्रीशिक्षणाला विरोध होत असे, पण वडिलांच्या प्रोत्साहनामुळे त्या अशा पद्धतीने शिकल्या. पुढे स्वप्रयत्नाने मराठी, इंग्रजी, संस्कृत नाटके वाचून त्यांनी आपली आवड जोपासली. तत्पूर्वी वयाच्या नवव्या वर्षी काशीबाईंचे लग्न वकील गोविंदराव कानिटकरांशी झाले. ते सुधारणावादी होते.

हरिभाऊ आपटे, न्या. रानडे यांच्या सहवासामुळे स्त्रियांनी शिकावे अशा विचारांचे ते होते, पण उघडपणे त्या काळात काशीबाईंचे शिक्षण सुरू ठेवण्याची सोय नव्हती. तरीही काशीबाई टीका सहन करीत चोरून मारून शिकत, वाचत राहिल्या. गोविंदरावांसोबत त्या रविवारी दुपारी प्रार्थनासमाजातील सभांना जात असत, चर्चेत भाग घेत असत. घरी समजले की खूप गहजब होत असे. मग त्यांच्यावर घरातील अवघड व श्रमाची कामे लादण्यात येत असत. पण ते काहीही असले तरी त्यांना या प्रार्थना समाजातील व्याख्याने ऐकून शास्त्रीय विषयांची गोडी लागली.


काशीबाईंनी मराठीतील प्राथमिक शास्त्रीय पुस्तके वाचली. मंडलिकांचा इतिहास, अर्थशास्त्र, कादंबरीसह भारतसार व पेशवे, होळकर, पटवर्धन, शिवाजी महाराज इ. बखरीही त्यांनी वाचल्या. याशिवाय कुमारसंभव, किरातार्जुनीय, मेघदूत या संस्कृत नाटकातील बरेचसे श्लोक त्यांनी तोंडपाठ केले होते. शाकुंतल, वेणीसंहार, मृच्छकटिक, मुद्राराक्षस इ. संस्कृत नाटकांचे वाचनही त्यांनी केले होते. इंग्रजीही त्या शिकत होत्या. गोविंदराव कानिटकर आणि काशीबाईंनी मिळून मनोरंजन आणि निबंधचंद्रिका नावाचे नियतकालिक सुरू केले.

मनोरंजन, नवयुग आणि विविधज्ञानविस्तार आदी मासिकांमधून काशिबाईंचे स्फुटलेखन प्रसिद्ध झाले आहे. रंगराव (१९०३) व पालखीचा गोंडा (१९२८) या कादंबऱ्या आणि शेवट तर गोड झाला (१९८९), चांदण्यातील गप्पा (१९२१), शिळोप्याच्या गोष्टी (१९२३) हे कथासंग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहेत. डॉ.आनंदीबाई जोशी :चरित्र व पत्रे या चरित्रात्मक पुस्तकाने साहित्यात त्यांना बरीच ख्याती मिळाली. हरीभाऊंची पत्रे हे त्यांचे पुस्तकही प्रसिद्ध आहे.

डॉ. आनंदीबाईंच्या चरित्र लेखनाला हात घालण्याची आपली कुवत नाही असे प्रामाणिकपणे म्हणतच, इंग्रजी शिकत, आनंदीबाईंसंबंधी देशभगिनीने लिहिणे कर्तव्य आहे या भावनेने त्यांनी डॉ. आनंदीबाई जोशींचे चरित्र लिहिले. काशीबाईंचे लेखन हे अनुभवावर आधारित असल्याने प्रत्ययकारी आहे. वर्णने लांबलचक, तपशीलवार असतात, पण त्यातही त्यांची सूक्ष्म निरीक्षण शक्तीच प्रत्ययाला येते. १९०६मध्ये पुणे येथील ग्रंथकार संमेलनाचे गोविंदराव कानिटकर अध्यक्ष होते. त्या संमेलनाला त्या एकट्या स्त्री लेखिका उपस्थित होत्या. १९०९मध्ये वसंत व्याख्यानमालेत काशीबाई अध्यक्ष होत्या. त्या पहिल्या स्त्री अध्यक्षा ठरल्या.

पुणे सेवासदन संस्थेच्या स्थापनेमध्येही काशीबाई यांचा सहभाग होता. रमाबाई रानडे सेवासदनच्या अध्यक्ष, तर काशीबाई उपाध्यक्ष होत्या. पंडिता रमाबाईंबरोबर काँग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनाला हजर असणाऱ्या आठ महिला सदस्यांपैकी महाराष्ट्रातील एकमेव हिंदू महिला-काशीबाई उपस्थित होत्या. अशा या महान लेखिकेचे ३० जानेवारी १९४८ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान





# जुन्या फोनला असे बनवा सीसीटीव्ही कॅमेरा

आता स्मार्टफोन हा मानवाच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनला आहे. फोनमध्ये येणाऱ्या नवनव्या वैशिष्ट्यांमुळे लोक त्यांचा फोन नेहमीच बदलत असतात. तुमच्याकडेही जुना स्मार्टफोन असेल आणि तुम्हाला त्याचे काय करायवे? असा प्रश्न पडला असेल, तर फोन सीसीटीव्ही कॅमेरा म्हणून वापरण्याचा पर्याय आहे. सोप्या स्टेप्स फॉलो करून हे करू शकता.

सर्व्हिलान्स सिस्टिम बसवण्यासाठी हजारो रुपये खर्च करावे लागतात, पण तुमची इच्छा असेल, तर तुम्ही तुमचा जुना स्मार्टफोनही सिक्योरिटी कॅमेरा म्हणून यूज करू शकता. विशेष म्हणजे, यासाठी आपल्याला कोणतेही वेगळे अटॅचमेंट खरेदी करण्याची गरज नाही. याच्या सहाय्याने तुम्हाला केवळ लाइव्ह फुटेजच पाहता येणार नाही, तर डिव्हाइसमध्ये सर्व्हिलांन्स फुटेज सेव्हही करता येईल. जाणून घ्या स्टेप्स...

सर्वप्रथम आपल्याला आपल्या जुन्या फोनध्ये सिक्योरिटी कॅमेरा ॲप इंस्टॉल करावे लागेल. अशी अनेक ॲप्स गूगल प्ले स्टोर आणि ॲपल ॲप स्टोअरवर लिस्टेड आहेत. मात्र जे ॲप आपल्याला क्रॉस-प्लॅटफॉर्म फंक्शनॅलिटीशिवाय लोकल आणि क्लाऊड स्ट्रिमिंग आणि क्लाऊडवर फुटेज स्टोर करण्यासारखे अथवा मोशन डिटेक्ट अलर्ट्स पाठविण्यासारखे फीचर्स देईल, असे ॲप निवडायला हवे. असे एक ॲप आहे, Alfred DIY CCTV Home Camera आणि हे सेट करणेही सोपे आहे. तुमच्या जुन्या आणि नव्या फोनवर Alfred DIY CCTV Home Camera ॲप डाउनलोड करा. आपल्या नव्या प्रायमरी फोनमध्ये ॲप ओपेने केल्यानंतर, स्क्रीनवर दिसणाऱ्या सूचनांचे पालन करत, 'Start'वर टॅप करा. आता 'Viewer' निवडल्यानंतर, 'Next'वर टॅप करावे लागेल. यानंतर आपल्याला आपल्या Google Accountच्या मदतीने Sign In करावे लागेल. जुन्या फोनवरही हीच प्रक्रिया करत आपल्याला 'Viewer'च्या ऐवजी 'Camera' निवडायचा आहे आणि त्याच Google अकाउंटला लॉगिन करायचे आहे. सेटिंग्जमध्ये जाऊन इतर आवश्यक बदल करू शकाल. जुन्या फोनच्या कॅमेऱ्याने रेकॉर्ड केलेले फीड प्रायमरी फोनमध्ये दिसेल.

# भारतीय उद्योगपती सर रतनजी टाटा



**निमित्त**

सर रतनजी जमशेटजी टाटा हे ब्रिटीश राजवटीत भारतीय फायनान्सर आणि फिलांथेरपिस्ट होते. रतनजी टाटा यांचा जन्म २० जानेवारी १८७१ रोजी ब्रिटिश भारतातील बॉम्बे येथे झाला. प्रख्यात पारशी व्यापारी जमशेटजी टाटा हे त्यांचे वडील होते.


रतन टाटा यांचे शिक्षण मुंबईतील सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये झाले आणि त्यानंतर त्यांनी वडिलांच्या फर्ममध्ये प्रवेश केला. १९०४मध्ये थोरल्या टाटांच्या मृत्यूनंतर, रतन टाटा आणि त्यांचे भाऊ दोराबजी टाटा यांना वारसाहक्काने खूप मोठी संपत्ती मिळाली. यापैकी बरीच संपत्ती त्यांनी व्यावहारिक स्वरूपाच्या परोपकारी कार्यांसाठी आणि भारताच्या संसाधनांचा विकास करण्यासाठी व विविध औद्योगिक उपक्रमांच्या स्थापनेसाठी समर्पित केली.

लंडन विद्यापीठात रतन टाटा फंडाची स्थापना केली : सर रतन टाटा यांना १९१६ मध्ये नाइटची पदवी देण्यात आली होती. त्यांनी त्यांचे कार्य भारतापुरतेच मर्यादित ठेवले नाही. १९१२मध्ये त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये रतन टाटा सामाजिक विज्ञान आणि प्रशासन विभागाची स्थापना केली. तसेच लंडन विद्यापीठात रतन टाटा फंडाची स्थापना केली. त्यांचे इंग्लंडमधील यॉर्क हाऊस, ट्विकेनहॅम येथे कायमस्वरूपी वास्तव्य होते. १९०९मध्ये त्यांनी रु. ५०,००० (२०२२मध्ये अंदाजे रु. ४० दशलक्ष समतुल्य) महात्मा गांधींना ट्रान्सवालमध्ये काम करण्याच्या भारतीयांच्या हक्काच्या लढ्यात मदत करण्यासाठी दान केले होते. ते कलेचे उत्तम जाणकार होते. छत्रपती शिवाजी महाराज वास्तू संग्रहालय (पूर्वीचे प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय) मध्ये सर रतनजी टाटा, सर दोराब टाटा आणि सर पुरुषोत्तम मावजी यांचे संग्रह प्रदर्शित करणारा एक विभाग आहे.

जमशेटजी टाटा यांच्या शेजारी दफन केले : भारतीय वैज्ञानिक आणि वैद्यकीय संशोधन संस्थेची (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, IISc) बंगळुरू येथे १९०५मध्ये स्थापना झाली. टाटा उद्योगांपैकी सर्वात महत्त्वाचे म्हणजे पश्चिम घाटातील जलशक्तीचा साठा करणे ज्यामुळे मुंबईला प्रचंड प्रमाणात विद्युत उर्जा उपलब्ध झाली आणि त्यामुळे त्यांच्या उद्योगांची उत्पादक क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली. त्यांनी १८९३मध्ये नवजबाई सेटशी लग्न केले आणि १९१५मध्ये ते इंग्लंडला रवाना झाले. त्यांनी दूरच्या नातेवाईकाच्या कुटुंबातील नवल टाटा यांना दत्तक घेतले. ६ सप्टेंबर १९१८ रोजी कॉर्नवॉल, इंग्लंडमधील सेंट इव्हस येथे त्यांचे निधन झाले आणि त्यांना त्यांचे वडील (जमशेटजी टाटा) यांच्या शेजारी लंडनजवळील ब्रूकवुड स्मशानभूमी, वोकिंग येथे दफन करण्यात आले.

सर रतनजी जमसेटजी टाटा हे भारतीय उद्योगपती आणि दानशूर होते. हे जमसेटजी टाटा यांचे पुत्र असून त्यांच्या मृत्यूनंतर रतनजी आणि दोराबजी या भावांनी जमसेटजींचे उद्योग सांभाळले. यांनी अनेक ऐतिहासिक वस्तू एकत्र केल्या होत्या. १९२३मध्ये या वस्तू टाटांच्या कुटुंबियांनी प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालयाला (आताचे छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय) दान केल्या. टाटांच्या मृत्यूनंतर १९१९ साली सर रतन टाटा ट्रस्ट ही समाजकारणी संस्था ८० लाख रुपयांसह (आताचे ७५ कोटी रुपये) स्थापन झाली. (साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा




## आरोग्य प्रहर

# अपुऱ्या झोपेमुळे हृदयावर ताण.. टिप्स करा फॉलो

निरोगी हृदय राखण्यासाठी रात्रीच्या वेळी पुरेशी झोप घेणे महत्त्वाचे आहे. अपुरी किंवा खराब-गुणवत्तेची झोप उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराशी संबंधित आहे. दुर्दैवाने, बर्याच लोकांना पुरेशी झोप मिळत नाही आणि बहुतेक लोकांना दिवसा झोप येते. किमान ८ तास शांत झोप घेणे ही काळाची गरज आहे. परंतु अनेकजण त्यांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे फक्त ५-६ तासच झोपतात. मात्र, संपूर्ण आरोग्य निरोगी राहण्यासाठी झोपेच्या चांगल्या सवयी बाळगणे गरजेचे आहे. याबाबत फिजिशियन, डायबेटोलॉजिस्ट आणि इंटेन्सिव्हिस्ट डॉ. सचिन नलावडे यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली आहे.



ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे हृदयाचे कार्य कसे बदलते यासह शरीरातील प्रत्येक अवयवावर याचा परिणाम होत असतो. हृदय आणि फुफ्फुसे दोन्ही छातीच्या पोकळीतील जागा व्यापत असल्याने, फुफ्फुसाच्या कार्यावर ताण येऊन हृदयाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. या शारीरिक ताणामुळे हृदयाचे स्नायू घट्ट होऊ शकतात आणि संपूर्ण हृदयाचे कार्यात बिघड निर्माण होऊ शकतो तसेच उच्च रक्तदाब आणि हृदयाची गती वाढू शकते. स्लीप ॲपनिया हा दिवसभराचा थकवा, मोठ्याने घोरणे आणि श्वास गुदमरल्यासारखे आवाज येणे, सकाळच्या वेळी डोकेदुखी, उठल्यावर तोंड कोरडे पडणे आणि शांत झोप न लागणे यासारख्या समस्या दिसू शकतात. ऑब्स्ट्रक्टिव्ह स्लीप एपनिया विकसित होण्याचा धोका वयानुसार वाढतो.

रात्रीच्या शांत झोपेची तयारी ही झोपेच्या आधीपासूनच सुरू होते. दिवसा सूर्यप्रकाशाच्या संपर्कात येण्यामुळे तुमच्या शरीराला दिवसाची वेळ असल्याचे संकेत मिळतो, ज्यामुळे झोपेची गती वाढते आणि मेलाटोनिन, स्लीप हार्मोनचे उत्पादन सुरू होते.

जेव्हा शक्य असेल तेव्हा दुपारनंतर कॅफेनयुक्त पदार्थांचे सेवन टाळा कारण त्याचे परिणाम रात्रीपर्यंत टिकून राहतात.

झोपण्यासाठी पुरेसा काळोख आणि थंड वातावरण निर्मिती करा आणि रात्री उशिरापर्यंत उत्तेजक क्रियांपासून दूर राहा. जसे की व्यायाम किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर.

सौम्य संगीत ऐका, गरम पाण्याने आंघोळ करा किंवा टिव्ही पाहण्याऐवजी झोपण्यापूर्वी वाचन करा. झोपण्यापूर्वी पाणी पिणे टाळा कारण तुम्हाला सतत लघवीसाठी उठावे लागेल आणि तुम्हाला शांत झोप घेती येणार नाही.

# माथेराननंतर नेरळजवळील चिंचवली हादरले!

## धारदार शस्त्रधारी पाच चोरांची रात्री दहशत, घरमालक जागा होताच अंगावर धावले

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान येथे वृद्ध दाम्पत्याचे हात-पाय बांधून, चाकूचा धाक दाखवत घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम लुटण्याची घटना ताजी असतानाच, आता नेरळ पोलिस ठाणे हद्दीत येणाऱ्या चिंचवली-भिवपुरी रेल्वे परिसरात शस्त्रधारी चोरांनी थेट दहशत माजवली आहे. घरात माणसे असतानाच दरोड्याच्या उद्देशाने आलेल्या पाच चोरांनी धारदार शस्त्र हातात घेऊन केलेली धाव ही तालुक्यासाठी अत्यंत गंभीर आणि भयावह ठरणारी आहे.

ही घटना चिंचवली येथील प्रतीक प्रमोद बुंधाटे यांच्या दोन मजली घरात घडली. रात्रीच्या सुमारास पूर्णपणे तोंड झाकून आलेले पाच शस्त्रधारी चोर आधी परिसरात रेखी करत होते. त्यानंतर त्यांनी जवळच्या दोन-चार घरांच्या बाहेरील दरवाज्यांना कड्या लावून थेट प्रतीक बुंधाटे यांच्या दोन मजली घराला लक्ष्य केले. तळमजल्यावरील दरवाजाला बाहेरून कडी लावून चोरटे बाहेरील जिन्याने वर चढले आणि खिडकीतून घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला.



मात्र खिडकीचा आवाज होताच घरमालकांचा मुलगा जागा झाला. त्याने खिडकी उघडून कोण आहे? असा आवाज दिला आणि दबा धरून बसलेले चोरटे अचानक धारदार शस्त्र घेऊन त्याच्याच दिशेने धावले. प्रसंग गंभीर बनत असल्याचे लक्षात येताच मुलाने खिडकी जोरात ओढून जोरात आरडाओरड सुरू केली. काही क्षण चोरटे दहशत माजवत तिथेच थांबले आणि नंतर जवळ उभ्या असलेल्या रिक्षातील काही साहित्य चोरून घटनास्थळावरून पसार झाले.

सलग दोन गंभीर घटनांमुळे चोरट्यांचा आत्मविश्वास वाढल्याचे स्पष्ट दिसत असून, पोलिस गस्त आणि प्रतिबंधक उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नेरळ पोलिस ठाणे हद्दीत घडलेला हा प्रकार केवळ चोरीचा प्रयत्न नसून, संभाव्य दरोड्याची नांदी मानली जात आहे.

दरम्यान चिंचवली येथील घडलेल्या घटनेने बाबत नेरळ पोलिस ठाण्यात अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनास्थळी नेरळ पोलिसांनी पाहणी केली.तर सीसी टिव्ही फुटेजच्या माध्यमातून चोरट्यांचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. तालुक्यातील नागरिक सध्या भीतीच्या सावटाखाली असून, प्रशासनाकडून ठोस आणि तातडीच्या कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

## संत बाळूमामा मंदिरात भक्तांची गर्दी

**खालापूर :** रविवारी अमावश्या निमित्ताने श्रीसंत बाळूमामा मंदिर पांगोळी, लोणावळा येथे असंख्य भाविक-भक्तांनी बाळू मामांचे दर्शन घेतल. पुणे व रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती असलेल्या पांगोळी धनगरवस्ती येथे बाळूमामांचे भव्य मंदिर आहे. दर अमावश्येला येथे भंडारा असतो. आज अमावश्या असल्याने सकाळ पासूनच भाविक भक्तांनी मामांचे दर्शना घेण्यासाठी गर्दी केली होती.

### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **उर्मिला अशोक गावंड, जयवंती गणेश पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पिरकोन (५५३३३९)**
(PU-ID : 21618978702), **तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २२२/१/ब **खाते क्र. ५४६** | १ | ०.१०.९० पो.ख. ०.००.५० | १.६२ |
| | | **एकुण ०.११.४०** | |
| **या एकूण विक्री क्षेत्राचे ०.११.४०** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

# पालीत डंपरचा फाळक्याची कडी तुटून अपघात

## बाईकस्वार गंभीर जखमी

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात शनिवारी (ता. १७) सायंकाळी भीषण अपघात घडला. ग. बा. वडेर हायस्कूल जवळील शतायु मेडिकल समोरून खडी घेऊन जाणाऱ्या एका डंपरच्या मागील फाळक्याची कडी अचानक तुटून मागील बाईकस्वाराच्या तोंडाला लागली. या अपघातात बाईकस्वार जबर जखमी झाला असून त्याच्या तोंडाला व जबड्याला मोठी दुखापत झाली आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

सचिन केंद्रे असे जखमी बाईकस्वारांचे नाव असून ते जांभूळपाडा येथे ग्रामविकास अधिकारी आहेत. शतायु मेडिकलच्या समोरून बल्लाळेश्वर मंदिर बाजूकडे एक डंपर जात होता आणि त्याच्या बाजूने हायस्कूलच्या बाजूकडे एक डंपर पुढे येत होता यावेळी या ठिकाणी ट्रॅफिक झाली होती. त्याचवेळी हायस्कूलच्या बाजूकडे जाणाऱ्या डंपरची कडी तुटून केंद्रे यांना लागली व हा अपघात झाला. त्यांचा ओठ फाटला आहे, दात पडले आहेत आणि



जबड्याला क्रॅक गेला आहे. नवी मुंबई येथे रुग्णालयात त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत.

या अपघातानंतर पालीतील प्रलंबित बाह्यवळण मार्गाचा (बायपास) मुद्दा आणि प्रशासकीय अनास्था पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. बाह्यवळण मार्ग लालफितीत असल्यामुळे भाविक, पर्यटक, प्रवासी, वाहनचालक व नागरिकांची गैरसोय होत आहे. तसेच अशा प्रकारचे अपघात देखील घडताना दिसत आहेत.

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असल्याने नेहमीच येथे भाविकांची गर्दी असते. पाली हे तालुक्याचे ठिकाण आहे. परिणामी अनेक लोक कामानिमित्त येत असतात. पालीतील अंतर्गत रस्ते अरुंद आहेत. बल्लाळेश्वर मंदिर, ग.बा. वडेर हायस्कूल, जुने एस.टी.स्टँड, गांधी चौक, बाजारपेठ, मारुती मंदिर अशा अनेक ठीकाणी नियमित वाहतूक कोंडी होते. हि वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी काही नाक्यावर काही वेळेस वाहतुक पोलीस तैनात असुन देखिल अरुंद रस्ते, अवजड वाहतूक, डबर व खडी वाहतूक करणारे डंपर, एकेरी वाहतुकीवरुन दुहेरी वाहतूक आणि वाहनचालकांनी वाहतुकिचे नियम न पाळल्याने व रस्त्याच्या दुतर्फा अवैध्यरित्या पार्क केलेली वाहने यांमुळे पोलीसांना या वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळविणे अवघड होते. अनेक वेळा वाहतुक कोंडीमुळे रुग्णांना तसेच रुग्णवाहिकेस रुग्णालयात पोहोचण्यास उशिर होतो. संध्याकाळ नंतर मात्र बऱ्याच वेळा वाहतुक पोलीस तैनात नसतात. तर अनेक महत्त्वाच्या ठिकाणी ते नसतात. आणि यावेळी सुद्धा बऱ्याचवेळा वाहतुक कोंडी होते. आणि प्रश्न गंभीर बनतो.

# तळा तालुक्यातील खाडी भाग मत्स्य व्यवसायासाठी पूरक

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्याला लाभलेला खाडी किनारा मच्छव्यवसायासाठीचे एक मोठे साधन आहे.तालुक्यातील रहाटाड, मांदाड, वाशीहवेवली, रोवळा,मजगाव,कुडे,आदी खाडीकिनारी भागातील खाडीलगत असणाऱ्या खारजमिनित तलाव खोदून त्याठिकाणी मच्छव्यसाय करण्यास एक चांगला सुपिक असा भाग आहे.त्यामुळे यातून अधिक अर्थिक उत्पन्न मिळण्यास मदत होईल.

या भागात अनेक ठिकाणी कोळंबी प्रकल्प सुरू आहेत. त्या प्रकल्पातून चांगला उत्पन्न मिळत असल्याचे पहावयास मिळत आहे.तालुक्यात मच्छव्यसायासाठी उपयुक्त अशी शेती , वातावरण व खाडीकिनारा यामुळे या भागात तलाव तयार केल्यानंतर त्यातील पाणीही मच्छीची वाढ होण्यासाठी पोषक ठरत असून येथील मच्छीला विशिष्ट प्रकारची चव असून मागणी चांगली होऊन ग्राहकांमध्ये वाढ होत असते.काही ठिकाणी असलेल्या तलावांतील कोळंबी मुंबई सारख्या ठिकाणी चांगल्या दरांनी जात आहे.



### जाहीर प्रगटन
**नांदेड येथील जिल्हा न्यायाधीश-१ यांच्या न्यायालयात**
**एम.ए.सी.पी.क्र. २३८/२०२४**

श्रीमती सुरेखा जाधव **विरूध्द** संगिता गरजे व इतर

प्रतिवादी- Sangita W/o. Bharat Garje
Age Major, Occu.: Business
R/o. Off No.B-320, Steel Chamber Tower,
Plot-514, Sec KWC, Tq. Panvel- 410218
As Well As
Sangita W/o. Bharat Garje
Age Major, Occu.: Business
R/o. Room No. 202, Uma Darshan Society
Plor No. 60/61, Sector 21, Kamothe, VTC,
Panvel Po. Panvel, Dist. Raigarh- ४१०२०६

दावा - कलम १६६ मोटार अपघात कायदा १९८८ मावेजा रूपये 3,00,000/- मिळणेबाबत.

ज्याअर्थी आपणांस जाहीरप्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती सुरेखा भ्र. सदाशिव जाधव व इतर यांनी आपल्या विरूध्द कलम १६६ मोटार अपघात प्रकरण दाखल केलेला आहे. सदरील प्रकरणात आपण प्रतिवादी असुन आपल्यावर बऱ्याचवेळा **समन्स/नोटीस** पाठविण्यात आल्या, परंतु आपण सदरील समन्स घेण्यास जाणून बुजून टाळाटाळ करत आहात असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

तरी या जाहीर प्रकटनाद्वारे आपणास कळविण्यात येते की, जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक २५/०३/२०२६ रोजी किंवा त्या पुर्वी आपण स्वतः किवा वकीलामार्फत हजर व्हावे असे कळविण्यात येते. जर आपण दिलेल्या वेळेत हजर राहण्यास कसूर केल्यास आपले विरूध्द एक्स पार्टी करण्यात येईल या संबंधी नोंद घ्यावी

आज दिनांक ०८/०१/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व सहीनिशी दिले.

आदेशावरून

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
कनिष्ठ लिपिक, नांदेड

**सही/-**
सहाय्यक अधिक्षक
जिल्हा न्यायालय, नांदेड

# मानिवली येथील स्मारकात हुतात्मा हिराजी पाटील यांना अभिवादन

**कर्जत : प्रतिनिधी**

हुतात्मा हिराजी पाटील यांच्या ११२ व्या जयंती निमित्त त्यांच्या मानिवली गावात असलेल्या हुतात्मा स्मारकात शालेय विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून अभिवादन केले. मानिवली ग्रामपंचायत आणि हुतात्मा स्मारक समिती फाउंडेशन यांच्या वतीने जयंती सोहळ्याचे आयोजन केले होते.

हुतात्मा हिराजी पाटील यांचा जयंती सोहळ्याचे आयोजन मानिवली येथील हुतात्मा हिराजी पाटील स्मारकात केले होते. १९ जानेवरी १९१४ रोजी जन्मलेले हिराजी पाटील यांचे देश पारतंत्र्यात असताना दोन जानेवारी १९४३ रोजी बलिदान झाले होते. त्यांची जयंती मानिवली येथील हुतात्मा स्मारकात मानिवली ग्रामपंचायत आणि मानिवली हुतात्मा स्मारक समिती फाउंडेशन यांच्या वतीने केले होते. याप्रसंगी हुतात्मा हिराजी पाटील यांच्या अर्ध पुतळ्याला विठ्ठल गवळी यांचे हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, स्मारक समितीचे अध्यक्ष प्रवीण डायरे, कर्जत पंचायत समिती शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी पद्माकर म्हात्रे, केंद्र प्रमुख नारायण सोनावण, माजी सरपंच लहूदास डायरे,स्मारक समितीचे उपाध्यक्ष जितेंद्र गवळी, समितीचे मनोहर डायरे, दिनेश गवळी, जयराम गवळी, माजी उप सरपंच प्रीतम डायरे, पोलीस पाटील उपस्थित होते.

यावेळी मानिवली ग्रामपंचायत हद्दीमधील वरई,अवसरे,निकोप आणि मानिवली शाळेतील विद्यार्थ्यांनी समूह गीते,पोवाडे,सादर केली. त्यात शाळा अवसरे यांनी समूहगीत आणि तनिष्का दिनेश गायकर हिने हुतात्म्यांच्या जीवनावरील भाषण केले. प्राथमिक शाळा निकोप यांनी समूहगीत सादर केले तर प्राथमिक शाळा वरई येथील विद्यार्थ्यांनी पोवाडा सादर केला. मानिवली शाळेतील पूजा डायरे हिने भाषणातून हुतात्म्यांची माहिती सांगितली तर अन्य विद्यार्थ्यांनी पोवाडा सादर करून अभिवादन केले. मुख्याध्यापक पद्माकर राठोड, सुनंदा पाटील,संज्योती कांबरी, केदारी, जरंग उपस्थित होते.



**परिशिष्ट क्र. १६**
(उपविधी क्र. ३५ अन्वये)
**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**

### नोटीस

**सरकारी नोकर** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा / बंगला क्र. ...... धारण करणाऱ्या **श्री. संतोष शंकर जोशी** यांचे तारीख ०४/०७/२०२५ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२:०० वा. ते दुपारी ४:०० वा. पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

**ठिकाण : नवीन पनवेल**
**दिनांक : १९/०१/२०२६**

**सही/-**
**सचिव**
सरकारी नोकर... सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नवीन पनवेल

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे चिखले, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - चिखले, ता. पनवेल, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | भोगवटाधारक | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १११ | १ | श्री. झकीर अल्ली अन्सारी | ०-४०-४० | २.१२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, इजमेंट, वारसाहक्क वगैरे इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदुतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ता. १९/०१/२०२६
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड. वाय. एस. भोपी**
१३५, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि. रायगड. मोबाईल : ९८२०२७३६९१

### जाहीर प्रगटन
**नांदेड येथील जिल्हा न्यायाधीश-१ यांच्या न्यायालयात**
**एम.ए.सी.पी.क्र. २४०/२०२४**

धारबा **विरूध्द** संगिता व इतर

प्रतिवादी- Sangita W/o. Bharat Garje
Age Major, Occu.: Business
R/o. Off No.B-320, Steel Chamber Tower,
Plot-514, Sec KWC, Tql. Panvel- 410218
As Well As
Sangita W/o. Bharat Garje
R/o. Room No. 202, Uma Darshan Society
Plot No. 60/61, Sector 21, Kamothe, VTC,
Panvel Po. Panvel, Dist. Raigarh- 410206
(Owner of Truck No. MH-46-AR-6920)

दावा - कलम १६६ मोटार अपघात कायदा १९८८ मावेजा रूपये 5,00,000/- मिळणेबाबत.

ज्याअर्थी आपणांस जाहीरप्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार धारबा पि. बळीराम सारंग यांनी आपल्या विरूध्द कलम १६६ मोटार अपघात प्रकरण दाखल केलेला आहे. सदरील प्रकरणात आपण प्रतिवादी असुन आपल्यावर बऱ्याचवेळा **समन्स/नोटीस** पाठविण्यात आल्या, परंतु आपण सदरील समन्स घेण्यास जाणून बुजून टाळाटाळ करत आहात असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

तरी या जाहीर प्रकटनाद्वारे आपणास कळविण्यात येते की, जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक २५/०३/२०२६ रोजी किंवा त्या पुर्वी आपण स्वतः किवा वकीलामार्फत हजर व्हावे असे कळविण्यात येते. जर आपण दिलेल्या वेळेत हजर राहण्यास कसूर केल्यास आपले विरूध्द एक्स पार्टी करण्यात येईल या संबंधी नोंद घ्यावी

आज दिनांक ०७/०१/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व सहीनिशी दिले.

आदेशावरून

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
कनिष्ठ लिपिक, नांदेड

**सही/-**
सहाय्यक अधिक्षक
जिल्हा न्यायालय, नांदेड

## नरेंद्र महाराज संस्थानच्या रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**पेण :** स्वामी नरेंद्रचार्य महाराज संस्थान सांप्रदायिक अनुयायातर्फे शिकवण सद्गुरूची धरुन उरी गरज रक्ताची करु पुरी, रक्तदान श्रेष्ठ दान या संकल्पनेला अनुसरून रविवार १८ जानेवारी रोजी दिवसभरात पेण शहरातील शरद पवार भवन तळमजला या ठिकाणी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन सांप्रदायिक अनुयायांनी केले

या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून रात्रीपर्यंत ३००हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले असून सेवाभावी उपक्रमांस भरघोस प्रतिसाद दिला.

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६
**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सूचना**

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.०३/०७/२०२६ — दिनांक : १९/०१/२०२६

**शुद्धीपत्रक**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/274/2025-26 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - अ, खारघर, सेक्टर-१२ (भाग-अ) मधील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण व पावसाळी गटार बांधणे. | रु.२५,६७,३८,६९३/- |

या कामाच्या ई-निविदेच्या शुद्धीपत्रकाबाबतची माहिती शासनाच्या 'https://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. १९/०१/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
अतिरिक्त आयुक्त -।
पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस

सर्व व्यक्तीस / लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, **श्री. गंगाधर कारभारी जाधव,** रा. ३०१, प्रसन्ना आर्केड, त्रंबक नाका, जुना आग्रा रोड, नाशिक-४२२००२, यांचे वैयक्तिक आणि स्वःकष्टार्जित ताबेकब्जा, मालकी हक्क आणि वहिवाटीत **मौजे-ढोकशेत, ता. सुधागड, जि. रायगड** येथे खालील वर्णनाची जमिन मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-ढोकशेत, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भुधारणा पद्धती | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| ४१५ | भोगवटादार वर्ग-१ | ०-५१-०० १-५६-०० पो.ख. **२-०७-०० एकूण** | ०.२२ |

सदर मिळकतीवर **श्री. गंगाधर कारभारी जाधव** यांचे व्यतिरिक्त इतर कुणाचाही कुठल्याही प्रकारचा कसलाही मालकी अथवा इतर हक्क - हितसंबंध नसून सदर मिळकतीवरील **श्री. गंगाधर कारभारी जाधव** यांचा मालकी हक्क निर्वेध आणि बोजारहित असल्याचा शोध / मालकी हक्क पडताळणी अहवाल खालील सही करणार यांस द्यावयाचा आहे.

सबब, सदर मिळकतीस अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्नवस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे कसलाही हक्क-हितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **२१ दिवसांचे आत** आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात. सदर **२१ दिवसांचे आत** कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असल्याचा आणि सदर मिळकतीत श्री. गंगाधर कारभारी जाधव यांचे व्यतिरिक्त इतर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क आणि हितसंबंध नसल्याचा शोध / मालकी हक्क पडताळणी अहवाल देण्यात येईल. सदर २१ दिवसांचे मुदतीनंतर आलेल्या तसेच पुरावा नसलेल्या तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती त्याअनुशंगाने ग्राहय धरल्या जाणार नाहीत / बंधनकारक असणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०१/२०२६
ठिकाण : पनवेल.

**सही/-**
**ॲड. शरद आर. जाधव**
संपर्कासाठी पत्ता : ००१, तळमजला, रॉयल प्राईड बिल्डींग, भुखंड क्र. ११३, मिडल क्लास को. ऑप. हौ. सोसायटी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२०६.

# उरणमध्ये राजकीय हालचालींना वेग

## जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी बैठकांवर भर





**उरण : प्रतिनिधी**

राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर उरण तालुक्यातील जिप-४ आणि पंचायत समितीच्या८ जागांसाठी सर्वच राजकीय पक्षांच्या बैठका सुरू झाल्या आहेत. फक्त २१ दिवसांचाच कालावधी उरल्याने सर्वच राजकीय पक्षांच्या हालचालींना वेग आला आहे.

राज्यातील १२ जिल्हा परिषद व त्या अंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे.५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या या निवडणुकीसाठी उरण तालुक्यातील सर्वंच राजकीय पक्षांनी लढविण्याच्या हालचालींना वेग आला आहे.

उरण तालुक्यात जिप-४ आणि पंसच्या ८ अशा एकूण १२ जागांसाठी निवडणूक होणार आहे. याआधी रायगड जिल्हा परिषदेच्या चाणजे,जासई, चिरनेर,नवघर या चार जागांपैकी कॉंग्रेस -२,शिवसेना-१, भाजपा - १असे बलाबल होते.तर उरण पंचायत समितीच्या चाणजे, केगाव ,जासई,चिर्ले,आवरे, चिरनेर, भेंडखळ, नवघर अशा एकूण ८ जागांपैकी शेकाप-५,शिवसेना-२, भाजप-१ अशी स्थिती होती. शेकापकडे बहुमत असल्याने उरण पंचायत समितीमध्ये शेकापची सत्ता होती.मात्र मुदत संपल्यानंतर मुदतीत निवडणूका घेतल्या गेल्या नाहीत.यामुळे उरण पंचायत समितीवर फेब्रुवारी २०२२ला प्रशासनाची नियुक्ती करण्यात आली होती.

चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीनंतर ५ फेब्रुवारी २०२५ रोजी निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानंतर उरण तालुक्यातील जिप-४ तर पंचायत समितीच्या ८ अशा एकूण १२ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी लढविण्याच्या हालचालींनी वेग घेतला आहे.या चार वर्षांच्या कालावधीनंतर प्रमुख राजकीय पक्षात फाटाफूट झाली आहे. त्यामुळे विखुरलेल्या राजकीय पक्षांसाठी ही निवडणूक आणखीनच आव्हानात्मक झाली आहे.सर्वच राजकीय पक्षांनी कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांच्या बैठका सुरू झाल्या आहेत. निवडणूका जिंकण्यासाठी कामाला लागा असे आदेश सर्वच राजकीय पक्षांनी कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना दिले आहेत.

# पनवेलमध्ये रस्ता सुरक्षा शिबिर



**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान जानेवारी २०२६ च्या निमित्ताने विद्यार्थी वाहक संस्था, पनवेल यांच्या वतीने आयोजित सुरक्षित वाहतूक मार्गदर्शन शिबीर व कार्यशाळा काळण समाज मध्यवर्ती सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक हेच आमचे ध्येय या ब्रीदवाक्याला अनुसरून झालेल्या या उपक्रमात वाहतूक नियमांचे महत्त्व, चालकांची जबाबदारी आणि पालकांची भूमिका यावर सविस्तर प्रबोधन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता स्कूल बस व व्हॅनच्या भव्य रॅलीने करण्यात आली. या रॅलीद्वारे पनवेल शहरातील नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. शिस्तबद्ध वाहतूक, वेगमर्यादा, सीटबेल्ट व हेल्मेटचा वापर याबाबत घोषवाक्यांच्या माध्यमातून संदेश देण्यात आला. रॅलीनंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून मुख्य कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

या कार्यक्रमाला आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते हरीश बेकावडे, नगरसेवक सुमीत झुंझारराव, नगरसेविका आर्या जाधव, माजी नगरसेवक शंकर म्हात्रे यांच्यासह अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. धामणी येथील ज्ञानाई माध्यमिक विद्यालय तसेच वाकडी येथील आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे माध्यमिक शाळेचे सुमारे सव्वादोनशे विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले. विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले व वाहतूक नियमांचे पालन करण्याची प्रतिज्ञा देण्यात आली.

आरटीओ निरीक्षक पृथ्वीराज काकडे, पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने, पोलीस हवालदार मुलानी आणि पोलीस शिपाई गळवे यांनी चालक व वाहनमालकांना मार्गदर्शन केले. स्कूल बस चालवताना येणाऱ्या अडचणी, आपत्कालीन परिस्थितीतील उपाययोजना, वाहनांची तांत्रिक तपासणी, विद्यार्थ्यांना चढ-उतार करताना घ्यावयाची काळजी याबाबत त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणांसह माहिती दिली. सामाजिक कार्यकर्ते हरीश बेकावडे यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी समाजाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली.'सारथी सुरक्षा सेवा'चे प्रवक्ते विनय मोरे यांनी रस्ता सुरक्षा विषयावर प्रभावी व्याख्यान देत चालकांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण केला.

विद्यार्थी वाहक संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग हुमणे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पदाधिकारी व सभासदांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# विभागीय आयुक्त कार्यालयात प्रजासत्ताक दिन पूर्वतयारीची बैठक



**नवी मुंबई, : रामप्रहर वृत्त**

भारतीय प्रजासत्ताक दिन कार्यक्रमाच्या अनुषंगाने पूर्व तयारीची बैठक कोकण विभागाच्या सामान्य शाखेच्या अपर आयुक्त फरोग मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालय समिती सभागृहात आज संपन्न झाली.

कोकण विभागीय स्तरावरील भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन समारंभ दि. २६ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी ०९.१५ वाजता साजरा होणार आहे. मुख्य शासकीय ध्वजारोहण कळंबोली सेक्टर १७ येथील पोलीस मुख्यालय मैदानावर होणार आहे. त्यानुषंगाने बैठकीत मार्गदर्शन करताना श्रीमती मुकादम यांनी कोकण भवनातील सर्व विभागाने हा सोहळा यशस्वीरित्या व उत्साहात साजरा करण्याबाबत सूचना दिल्या. प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडावी आणि हा कार्यक्रम उत्साहात साजरा करावा, असे सांगून सर्वांनी शासकीय पोशाखात कार्यक्रमास उपस्थित राहाव, असे त्यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीत पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांसह कोकण विभागातील विविध शासकीय विभागांचे अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

# मेहंदी व चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नवी मुंबई सांस्कृतिक कला - क्रीडा महोत्सव २०२६' अंतर्गत सीबीडी बेलापूर येथील सुनील गावस्कर मैदानावर महिलांसाठी मेहंदी स्पर्धा, तसेच लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. महिलांच्या व बालकांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांना प्रोत्साहन व वाव मिळावा या उद्देशाने आयोजित या स्पर्धांमध्ये शेकडो महिला, युवती व लहान मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कलेचे



सुंदर सादरीकरण केले.

या स्पर्धांमुळे महोत्सवात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. विविध वयोगटातील महिला व बालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. मेहंदी स्पर्धेत महिलांनी नवनवीन डिझाईन्स, पारंपरिक व आधुनिक कलाकृती सादर करत उपस्थितांची मने जिंकली. तर चित्रकला स्पर्धेत लहान मुलांनी रंगांच्या माध्यमातून आपली कल्पकता, सामाजिक विषय आणि निसर्गाचे दर्शन घडवले. परीक्षकांनी सहभागींच्या सर्जनशीलतेचे विशेष कौतुक केले.

या सोहळ्यास आमदार मंदाताई म्हात्रे यांनी उपस्थित राहून महिलांच्या व बालकांच्या कौशल्याचे मनःपूर्वक कौतुक केले. यावेळी महिलांबरोबरच लहान मुलांच्या कलेचा सन्मान करत त्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरलेल्या 'आनंद कलामंच' प्रस्तुत लावणी महोत्सवात आशिमिक कामठे यांच्या दमदार सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. येत्या २५ तारखेपर्यंत या मैदानावर अशाच विविध सांस्कृतिक स्पर्धा व दर्जेदार कार्यक्रमांची मोठी रेलचेल पाहायला मिळणार आहे. तरी सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबासह या महोत्सवास आवर्जून भेट द्यावी असे आवाहन बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी केले. यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत परिसरातील महिला,लहान मुले, रहिवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किल्ले शिवनेरीवर स्वच्छता अभियान

**उरण : बातमीदार**

शिव प्रतिष्ठान व शिव मावळे करंजाडे यांच्या वतीने माझा किल्ला माझी जबाबदारी ही संकल्पना किल्ले शिवनेरी वरती मोठ्या उत्साहात पार पडली.

शिव प्रतिष्ठानच्या वतीने सर्व शिव भक्तांना शिव प्रतिष्ठानचे



अध्यक्ष सत्यजित पाटील ह्यांच्या वतीने असे आवाहन करण्यात आले की किल्ले हे बघण्यासाठी येऊ नका किंवा किल्ल्यांवरती एक पर्यटन स्थळ म्हणून न पाहता तेथे येणाऱ्या सर्व शिव भक्तांनी आपले गड किल्ले कसे स्वच्छ राहतील ह्या कडे लक्ष दिले पाहिजे असे आवाहन केले. शिव प्रतिष्ठान व शिव मावळ्यांनी जे स्वच्छता अभियान राबविला आहे ह्या उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

अश्या प्रकारचे अभियान सर्व संस्थानी राबविले पाहिजे तरच गडकिल्ले स्वच्छ होतील असा विचार विविध सामाजिक संस्था संघटनानी व्यक्त केला आहे.या स्वच्छता मोहिमेत शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष सत्यजित पाटील,सुनील अंबावडे ,अविनाश ठोसर ,प्रशांत शेट्टी ,सुरेश बारवे , संदीप पाटील ,राकेश कुसले ,अमर कुसले ,दिनेश तेमगिरे ,शंतनू कदम ,रोहन शिर्के , योगेश कुलुल ,सिद्धांत अंबावडे ,दीपक चौधरी ,अक्षय मोरे ,ओमकार ,अथर्व आदी मान्यवरांनी भाग घेऊन ही स्वच्छता मोहीम पार पडली.

# युईएस कॉलेजचे सात दिवसीय निवासी शिबिर

**उरण : वार्ताहर**

यु. ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड टेक्नॉलॉजीच्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत सात दिवसीय निवासी शिबीराचं दिनांक १२ ते १८ जानेवारी या कालावधीमध्ये द्रोणागिरी हायस्कूल करंजा, उरण येथे आयोजन करण्यात आले होते. ह्या शिबिराचे उद्घाटन यु. ई. एस. संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत ठक्कर ह्यांच्या हस्ते झाले.

या वेळी यु. ई. एस. संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, द्रोणागिरी शाळा समितीचे प्रशासक हर्षद कोळी, करंजा ग्रामपंचायत सरपंच अजय गोविंद म्हात्रे, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सोनाली कोळी, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख व राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी व सदस्या उपस्थित होत्या. या शिबिरामध्ये एकूण ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. संस्थेचे उपाध्यक्ष



. मिलिंद पाडगांवकर यांनी एनएसएसच्या विद्यार्थ्यांना एकत्रित कामाचे महत्त्व सांगितले.

ह्या शिबीरा मध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, जसे की दररोज योगा, श्रमदान, श्री. मनोहर म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना आत्मसंरक्षण कसे करायचे ह्याचे प्रशिक्षण दिले, डॉ. सत्या ठाकरे यांचे करिअर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले आणि रिलायन्स निमेशन एण्ड मीडिया टीमद्वारे निमेशन, व्हीएफएक्स, गेमिंग आणि कॉमिक्सवर माहितीपूर्ण सत्र यांसारखे अनेक उपक्रम राबवण्यात आले. श्री. हर्षद कोळी यांनी व्यवसाय कसा सुरू करावा यावर व्याख्यान दिले. विद्यार्थ्यांनी शाळेतील भिंतींवर चित्रकला (वॉल पेंटिंग) केली. तसेच विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत, आपत्ती व्यवस्थापन आणि कचरा व्यवस्थापन यावर सामाजिक जनजागृती रॅलीचे आयोजन केले. एनएसएस स्वयंसेवकांनी शाळेतील मुलांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श तसेच इतर सामाजिक विषयांवर जागरूकतापर मार्गदर्शन केले. तर यु. ई. एस. संस्थेचे मानद सचिव ड. राजेंद्र भानुशाली यांनी जीवनविषयक तत्त्वज्ञान ह्या विषयावर विदयार्थ्यांना व्याख्यान दिले.

सात दिवस चाललेल्या ह्या निवासी शिबीरामुळे विद्यार्थ्यांना विविध गोष्टीचें ज्ञान प्राप्त झाले. त्यांच्या मध्ये शिस्त निर्माण होऊन, जीवनाला बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन अजून सकारात्मक झाल्याचं पाहण्यात आले. ज्यामुळे हा सात दिवसीय निवासी शिबीर, सर्व शिक्षक तसेच सर्व व्यवस्थापकीय सदस्यांच्या कौतुकास पात्र ठरला. सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या व वाणिज्य विभागाच्या विभाग प्रमुख ह्यांच्या उपस्थितीत समारोपाचा कार्यक्रम संपन्न झाला.

# नेरुळ सार्वजनिक ग्रंथालयातर्फे मासिकाचे प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरुळ ज्येष्ठ नागरिक संघ सार्वजनिक ग्रंथालयातर्फे ११ जानेवारी रोजी ज्येष्ठ नागरिक भवन येथे ज्येष्ठ लेखिका व मिळून साऱ्याजणी या लोकप्रिय मासिकाच्या संपादिका गीताली वि.मं. (पुणे) यांच्या उपस्थितीत ग्रंथालयाचे अध्यक्ष प्रभाकर गुमास्ते यांच्या हस्ते मिळून साऱ्याजणी मासिकाचे प्रकाशन मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी मासिकाचे नवी मुंबई समन्वयक डॉ. अजित मगदूम, प्रा.वृषाली मगदूम व इतर मान्यवर उपस्थित होते.

आयोजित चर्चासत्रात गीताली वि. मं. यांनी समाजातील स्त्री-पुरुष विषमतेवर परखड विचार मांडले. स्त्रियांना सर्वच क्षेत्रांत मानाचे स्थान मिळाले पाहिजे, असे सांगताना महिला चळवळ ही पुरुषांविरोधात नसून पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून चालणारी चळवळ आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. स्त्रियांकडे दुय्यम भूमिकेत न पाहता स्वतंत्र व्यक्ती म्हणून पाहण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित पुरुषांना केले. यावेळी सुचित्रा कुंचमवार, वृंदा परुळेकर, पी.आर.गुफ्ता, घनश्याम परकाळे, गजानन म्हात्रे, परब, सुनील तांबे, गिरीजा, रमेश गायकवाड आदींनी चर्चेत सक्रिय सहभाग घेतला.


यावेळी अध्यक्ष प्रभाकर गुमास्ते यांनी ग्रंथालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देत आगामी कार्यक्रमांचीही रूपरेषा मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल सुचित्रा कुंचमवार यांनी केले, तर खजिनदार रमेश गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाला ग्रंथालयाचे पदाधिकारी, नवरंग संस्थेचे पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक संघ नेरुळ कार्यकारिणीचे सदस्य तसेच मोठ्या संख्येने वाचकवर्ग उपस्थित होता.

# माघी गणेशोत्सवासाठी चिरनेर सज्ज

**उरण : रामप्रहर वृत्त**

गुरुवारी (दि.२२) जानेवारी रोजी येणाऱ्या माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने उरण तालुक्यातील ऐतिहासिक चिरनेर नगरीतील अत्यंत प्राचीन अशा श्री महागणपती मंदिरात येणाऱ्या लाखो भाविकांची गर्दी लक्षात घेऊन, मंदिर प्रशासनासह चिरनेर ग्रामस्थांनी भक्तांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी सुरू केली आहे.

तालुक्यातील चिरनेर येथे अष्टविनायकासारखे श्री महागणपती हे प्रख्यात देवस्थान असल्याने येथील जागृत महागणपतीचे दर्शन घेण्यासाठी भाविक भक्तगण चिरनेर तीर्थस्थळी येत



असतात. या सर्व भक्तगणांची गैरसोय होऊ नये, सर्वांना सुखकर सोयी सुविधा मिळून, रांगेत दर्शन घेता यावे, वाहतूक कोंडी होऊ नये, गणेश भक्तांना पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय व महाप्रसादाची व्यवस्था व्हावी, त्याचबरोबर कोणताही अनुचित व उत्सवाला गालबोट लागणारा प्रकार घडू नये, यासाठी कडक बंदोबस्त, तसेच चिरनेर गणपती देवस्थान प्रशासनाकडून आवश्यक व सुसज्ञ असे नियोजन करण्यात आले आहे.

मंदिर प्रशासनाचे अध्यक्ष महेंद्र पाटील, उपाध्यक्ष मंगेश पाटील, सचिव अमर ठाकूर, खजिनदार संजय मोकल, विश्वस्त मंगेश पाटील, विजय पाटील, चंदन कडू, अमित मुंबईकर, गणेश पाटील, कैलास पाटील, नरेश पाटील या विश्वस्तांसह चिरनेर मुळपाडा गाव कमिटीचे अध्यक्ष सुजित पाटील, उपाध्यक्ष किरण भाकुर्ले कर, खजिनदार मयूर म्हात्रे, सचिव सुनीत ठाकूर, सदस्य प्रीतम ठाकूर, मिथुन पाटील, सुशील पाटील, शुभम मुंबईकर हे सर्व तयारी करीत आहेत .

दरम्यान माघी गणेश जन्मोत्सव सोहळा सोमवारी (दि.१९ ) जानेवारी ते शुक्रवार (दि.२३) जानेवारी पर्यंत चालणार आहे. यात श्रींचा महाअभिषेक, महापूजा, जन्मोत्सव सोहळा, महाआरती, महाप्रसाद, श्रींची पालखी मिरवणूक, भजन, कीर्तन, भावगीते व भक्तीगीतांचे कार्यक्रम होणार आहेत. यात प्रामुख्याने पुण्याचे कीर्तनकार ह. भ. प. राजेंद्र मांडेवाल यांचे श्रींच्या जन्मोत्सवानिमित्ताने पाच दिवस कीर्तन होणार असून, ललिताच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता होणार आहे. अशी माहिती मंदिर प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# प्रगत यांत्रिक रक्ताभिसरणाच्या सहाय्याने ६० वर्षांच्या वृद्धाचे वाचवले प्राण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईने बिहारमधून आलेल्या एका ६० वर्षीय व्यक्तीवर अत्यंत गुंतागुंतीची आणि खूप जास्त जोखीम असलेली कोरोनरी अँजिओप्लास्टी यशस्वीरित्या पार पाडली. रुग्णाला तीव्र हृदयविकाराचा झटका आला होता, ज्यामुळे त्याच्या हृदयाची पंपिंग क्षमता फक्त २०% इतकीच उरली होती.

रुग्णाने त्यांच्या शहरामध्ये करून घेतलेल्या सुरुवातीच्या चाचण्यांमध्ये व्यापक कोरोनरी धमनी रोग (हृदयाच्या धमन्यांमध्ये भरपूर ब्लॉकेज) आढळून आला. हृदयाच्या दोन मुख्य धमन्यांमधील ब्लॉकेजेस खूप गंभीर होती, तर तिसरी धमनी १००% ब्लॉक होती. सामान्यतः, अशा स्थितीसाठी बायपास सर्जरी आवश्यक असते, परंतु रुग्णाची गंभीर स्थिती आणि कार्डियाक एमआरआय अहवाल ज्यामध्ये हृदय त्याच्या सामान्य क्षमतेच्या फक्त एक तृतीयांश इतकेच काम करत असल्याचे दिसून आले - शस्त्रक्रिया खूप धोकादायक मानली गेली.

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईतील कन्सल्टन्ट कार्डिओलॉजिस्ट डॉ. अमित सिंग म्हणाले, रुग्णाची स्थिती अत्यंत धोकादायक होती, त्यामुळे बायपास सर्जरी करणे अशक्य होते, परंतु ते मोठ्या आशेने आमच्याकडे आले होते. सविस्तर मूल्यांकन आणि जोखीम नियोजनानंतर, आम्ही इंट्रा-ऑर्टिक बलून पंप द्वारे यांत्रिक रक्ताभिसरण सपोर्टसह एक जटिल परक्यूटेनियस कोरोनरी हस्तक्षेप करण्याचा निर्णय घेतला. जेव्हा हृदयाचे स्नायू शिथिल होतात आणि हृदयात रक्त भरते (डायस्टोल), तेव्हा हा बलून फुगतो; आणि हृदय आकुंचन पावून शरीरात रक्त पंप करण्याच्या क्षणापूर्वी (सिस्टोल) तो पुन्हा पूर्वस्थितीत येतो (डिफ्लेट होतो). ही प्रक्रिया हृदयावरील कामाचा ताण कमी करून कोरोनरी रक्तप्रवाह सुधारण्यास मदत करते. उच्च-जोखीम असलेल्या उपचारांदरम्यान, जेव्हा रक्तदाब अस्थिर होतो, तेव्हा हे तंत्रज्ञान एक अत्यंत महत्त्वाचे जीवनरक्षक आधार पुरवते. हृदयविकारामुळे शरीरातील अतिरिक्त द्रवपदार्थ कमी करून श्वास घेण्यास त्रास कमी करण्यात आला. अँजिओप्लास्टीदरम्यान रक्ताभिसरण समर्थन प्रदान करण्यासाठी धमनी मार्गातून इंट्रा-ऑर्टिक बलून पंप घातला गेला.

हृदयातील लांब ब्लॉकेजेस (अडथळे) दूर करण्यात आले आणि क्लिनिकल गरजेनुसार पूर्णपणे बंद पडलेल्या धमनीमध्ये स्टेंट बसवून ती यशस्वीरीत्या पुन्हा सुरू करण्यात आली. प्रक्रियेदरम्यान रुग्णाला अनेक वेळा गंभीर 'हायपोटेंशन' या समस्येचा सामना करावा लागला.

# खालापुरात जि.प., पं.स. निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

**खोपोली : प्रतिनिधी**

चार वर्षानंतर मुहूर्त मिळालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी खालापुरातील प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्हा परिषदेचे चार गट आणि पंचायत समितीचे आठ गण यासाठी निवडणूक होत आहे. सुमारे १ लाख १० हजार ९८२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.



१६ ते २१ जानेवारी हा कालावधी नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी असून ५ फेब्रुवारीला मतदान होणार आहे, तर निकाल ७ जानेवारीला लागणार आहे. खालापूर तालुक्यात नुकत्याच खोपोली नगर परिषदेची निवडणूक शांततेत पार पडली, पण त्यानंतर झालेल्या खूनाच्या घटनेनंतर राजकीय वातावरण अद्याप अशांत आहे. अशा परिस्थितीत होणाऱ्या निवडणुकीसाठी प्रशासन विशेष काळजी घेत आहे.

चौक जिल्हा परिषद गटात एकूण मतदार २७,३६५ असून चौक पंचायत समिती गणात पुरुष ६८७५, महिला ६८८२ व इतर एक असे एकूण १३,७५८ मतदार, तर हाळखुर्द पंचायत समिती गणात पुरुष ६७३२ व महिला ६८७५ असे १३,६०७ मतदार आहेत.

वासांबे जिल्हा परिषद गटाची मतदार संख्या २८,०७४ असून रिस पंचायत समिती गण पुरुष ७५६४, महिला ७११८ व एक असे १४६८३ मतदार, तर वासांबे पंचायत समिती गणात पुरुष ७०३९, महिला ६३५१ व इतर एक असे १३,३९१ मतदार आहेत.

सावरोली जिल्हा परिषद गटात एकूण मतदार २८,३४० असून वाशिवली पंचायत समिती गणात पुरुष ६९९६ व महिला ७१७१ असे १४,१६७ मतदार, तर सावरोली गणात पुरुष ६९१२ व महिला ७२६१ असे मिळून १४,१७३ मतदार आहेत.

आत्करगाव जिल्हा परिषद गटात एकूण मतदार २७,२०३ असून खानाव पंचायत समिती गणात पुरुष ६७९७ व महिला ६९१३ असे मिळून १३,७१० मतदार, तर आत्करगाव पंचायत समिती गणात पुरुष ६७६१ व महिला ६७३२ असे मिळून १३,४९३ मदार आहेत.

खालापूर तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी पुरुष ५५,६७६, महिला ५५,३०३ व इतर तीन असे मिळून एकूण एक लाख १० हजार ९८२ मतदार आहेत, तर मतदान केंद्र संख्या चौक विभागात व वासांबे विभागात प्रत्येकी ३६, सावरोलीत ३८ आणि आत्करगाव विभागात ३४ आहे. निवडणुकीसाठी प्रशासनाने तयारी केली आहे.

# खोपोलीत महिलांचा सन्मान सोहळा
## सुवर्णा मोरे, सावित्री जाधव यांना पुरस्कार

**खोपोली : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन आणि स्वामीनी महिला प्रतिष्ठान खोपोली यांच्या वतीने स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ आणि स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्ताने महिलांचा सन्मान सोहळा आणि हळदी कुंकूवाचा कार्यक्रम पार पडला,

या वेळी राजमाता जिजाऊ पुरस्कार नवनिर्वाचित नगरसेविका तथा उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सुवर्णा मोरे यांना, तर ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार सामाजिक कार्यकर्त्या सावित्री जाधव यांना देण्यात आला.

या कार्यक्रमाला खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, नगरसेवक अनिल सानप, दिनेश थोरवे, नगरसेविका रेश्मा गायकवाड, अश्विनी अत्रे, सुवर्णा मोरे, रुपाली जाधव, रुकसाना जळगावकर, सानिया शेख, श्रुती पालांडे, प्रतीक्षा रेटरेकर, स्वामींनी प्रतिष्ठान खोपोलीच्या अध्यक्ष कांचन  जाधव, उपाध्यक्ष शीतल डोखले, सदस्य उज्वला वाघेला, आशा जाधव, सावित्री जाधव, संध्या जाधव, ताराराणी ब्रिगेडच्या अध्यक्ष वंदना मोरे, माजी नगरसेविका केविना गायकवाड, रेश्मा आंग्रे, यांच्यासह अनेक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# लोखंडे विद्यालयात इनोव्हेशन फेयर अंतर्गत विविध प्रकल्पांचे सादरीकरण

**मुरूड : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी आणि जिज्ञासा जागृत करण्यासाठी अगस्त्य इंटरनॅशनल फाउंडेशनच्या सौजन्याने इनोव्हेशन फेयरचे आयोजन अशोक ल. लोखंडे विद्यामंदिर, पिटसई येथे करण्यात आले होते.

उपक्रमाचे उद्घाटन शाळेचे चेअरमन खेळूशेठ वाजे यांच्या हस्ते झाले. मुख्याध्यापक अरुण खुळपे, ज्येष्ठ शिक्षक अकील मुलाणी, सुखदेव सर्जे, भागीनाथ बांगर, सुनील तेलंगे, एकनाथ कोळी, रेखा रेडीज, सुप्रिया रेडीज, वरिष्ठ लिपिक दीपक भोसले आदी उपस्थित होते.

सातवी व आठवीतील विद्यार्थ्यांनी इनोव्हेशन फेयर अंतर्गत विद्यालयात काही प्रोजेक्ट सादर केले. यामध्ये नो पार्किंग अलर्ट, डॉक्टर अपार्टमेंट डिस्पेन्सर, सेफ ड्रॉइंग सिस्टीम,  बस सीट बेल्ट, थिफ अलर्ट, गॅस लिकेज अलार्म, इनोव्हेटिव्ह अटेंडन्स बोर्ड, वॉटर लेवल इंडिकेटरचा समावेश होता. या प्रोजेक्टचे मूल्यांकन करून विजेत्या प्रथम तीन स्पर्धकांना प्रमाणपत्र व गिफ्ट देण्यात आले.




# नागोठणे आयटीआयमध्ये तंत्र प्रदर्शन

**धाटाव : प्रतिनिधी**

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागोठणे येथे आयोजित संस्थास्तरीय तंत्र प्रदर्शन उत्साहपूर्ण वातावरणात झाले. विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यांचे, नवकल्पनांचे व व्यावहारिक ज्ञानाचे प्रभावी दर्शन या प्रदर्शनातून घडले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन दीपक बाक्कर (गणित चित्रकला निदेशक, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल) यांच्या हस्ते पार पडले. प्रमुख पाहुणे म्हणून चैताली पाटील व तृप्ती पाटील (सह प्राध्यापिका, आनंदीबाई प्रधान सायन्स कॉलेज, नागोठणे) उपस्थित होत्या तसेच संस्थेचे प्रभारी प्राचार्य तथा गट निदेशक एस.एस. भगत, सर्व अधिकारी व कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या तंत्र प्रदर्शनामध्ये विविध व्यवसायातील विद्यार्थ्यांनी तयार केलेले एकूण ३० नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व तांत्रिक विचारसरणीला या उपक्रमामुळे चालना मिळाल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

परीक्षकांच्या परीक्षणानंतर विविध प्रकल्पांनी उत्कृष्ट कामगिरी करत पारितोषिके पटकावली. प्रथम क्रमांक इलेक्ट्रिशन सिनिअर कॅम्पिंग युनिट (मार्गदर्शक पूजा आमले, निदेशिका, इलेक्ट्रिशन सिनिअर), द्वितीय क्रमांक वायरमन रिमोट कंट्रोल रिव्हर क्लिनिंग  बोट) (मार्गदर्शक गौरव चव्हाण, निदेशक, वायरमन), तृतीय क्रमांक मेकॅनिक मोटर व्हेईकल चार्जर युजिंग अल्टनॅटर (मार्गदर्शक  अभिजीत खरजे, निदेशक, मेकॅनिक मोटर व्हेईकल) यांनी मिळविला.

प्रदर्शनाच्या समारोप समारंभात सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे, विजेत्या संघांचे तसेच यशस्वी आयोजनासाठी योगदान दिलेल्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, नवकल्पना व आत्मविश्वास वाढीस लागतो, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# विवा कॉलेजतर्फे मान्यवरांचा पुरस्काराने सन्मान

**माणगाव : प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या माणगाव येथील प्रोफेशनल एज्युकेशन सोसायटीच्या विवा कॉलेजतर्फे सह्याद्री २०२६ कार्यक्रमांतर्गत कुणबी भवन हॉल या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र साळवी, प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा, आदर्श शिक्षिका विनया जाधव, विवा कॉलेजच्या चेअरमन विनया ढेपे, प्राचार्य विवेक ढेपे, प्रा.वाघमारे,अनिकेत घोसाळकर, महेश ढेपे आदींच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान केले गेले. या वेळी मार्गदर्शन करताना राजेंद्र साळवी यांनी, विवा कॉलेजने



अनेक विद्यार्थी घडविल्याचा रास्त अभिमान वाटत असून हे कॉलेज विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करते हीदेखील अभिनंदनीय बाब असल्याचे नमूद केले.

विजयशेठ मेथा यांनी या कॉलेजमध्ये विविध कोर्सेसचे शिक्षण विद्यार्थी घेत असून कॉलेज अल्पावधीत नावारूपाला येईल असे सांगून प्राचार्य विवेक ढेपे व सहकारी यांना शुभेच्छा दिल्या.

यंदा विविध क्षेत्रातील ३१ मान्यवर व्यक्तींचा पुरस्काराने कॉलेजतर्फे सन्मान करण्यात आला. यामध्ये कांचन बुटाला, कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, विशाल टेंबे, अकबर परदेशी, सुभाष शिंदे, सचिन तरडे, हभप जयराम खाडे, महेश शिरशिवकर, डॉ.अमेय उभारे (सामाजिक), स्मिता पवार, सुखदेव मोरे, अर्जुन कुंदन, अरुण जाधव, धरमचंद्र पाटील, अर्चना साटम व संदीप भगत, उर्मिला भोरे, विद्या पवार, नंदकुमार गावंड, अनिल वाघ, अतिफ पारकर (शैक्षाणिक), संजय भुवड, दिलीप करकरे (पत्रकारिता), काजल पाखुर्डे, राजेश यादव (सांस्कृतिक), कल्पेश नलावडे (शासकीय), अथर्व लाड, हितेश ढेपे, अमित धसाडे शुभम गायकवाड (क्रीडा) यांचा समावेश आहे.

# ज्येष्ठांना वॉकिंग स्टिक्सचे वाटप
## सामाजिक कार्यकर्ते अंकुश आपटेंची बांधिलकी



**पाली : प्रतिनिधी**

पालीतील सामाजिक कार्यकर्ते अंकुश आपटे यांच्या वतीने साठ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना चालण्यासाठी उपयुक्त अशा वॉकिंग ट्रायपॉड स्टिक्सचे नुकतेच वाटप करण्यात आले. देऊळवाडा येथील मरीमाता मंदिराच्या परिसरात हा कार्यक्रम झाला.

या वेळी २५ गरजू वयोवृद्धांना ट्रायपॉड स्टिक्स देण्यात आल्या. हा आधार मिळाल्यानंतर अनेक वृद्धांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले.कार्यक्रमास गावकीचे अध्यक्ष अनंता दंत, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जगताप यांच्यासह ज्येष्ठ ग्रामस्थ आणि तरुण कार्यकर्ते उपस्थित होते.

# खोपोलीत आगरी समाजातर्फे विद्यार्थी गुणगौरव, हळदीकुंकू समारंभ

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहर आगरी समाजाच्या वतीने मेळावा आणि विद्यार्थी गुणगौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याच कार्यक्रमांतर्गत आगरी महिला भगिनींसाठी हळदी-कुंकवाचा कार्यक्रमदेखील उत्साहात पार पडला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्यासह सर्वपक्षीय नगरसेवक, नगरसेविका व अन्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक व निवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला तसेच समाजातील विशेष कर्तृत्व करणाऱ्या कर्तृत्ववान आगरी समाज बांधवांचा विशेष सत्कार करून त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेण्यात आली.




कार्यक्रमास आगरी समाज बांधवांची बहुसंख्येने उपस्थिती लाभली. संपूर्ण कार्यक्रम आनंद, आपुलकी व उत्साहाच्या वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे आयोजन आगरी समाज खोपोलीचे अध्यक्ष सुभाष घासे, उपाध्यक्ष नंदकुमार मिठागरे, खजिनदार राजेंद्र म्हात्रे, सचिव धर्मेंद्र म्हात्रे तसेच राजेंद्र भोईर, बी.एस. म्हात्रे, मनोहर म्हात्रे व इतर सर्व सदस्यांच्या अथक प्रयत्नांतून यशस्वी झाले. या वेळी गुणवंत विद्यार्थी तसेच समाज बांधवांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## रवींद्र आंधळे यांचे स्पर्धेत यश

**पाली : प्रतिनिधी**

शिक्षक कर्मचारी स्पर्धा अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय व्यक्ती अभ्यास स्पर्धेत जिल्हा परिषदेच्या तिवरे शाळेचे उपशिक्षक रवींद्र आंधळे यांनी यश संपादन केले आहे. संपूर्ण राज्यातून निवडण्यात आलेल्या १० सर्वोत्तम शिक्षकांमध्ये स्थान मिळवून त्यांनी सुधागड तालुक्याचा नावलौकिक वाढवला आहे.

रवींद्र आंधळे यांनी या स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यात तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यानंतर मुंबई विभागातही त्यांनी आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत यश मिळवले. या कामगिरीच्या जोरावर त्यांची निवड नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली. राज्यभरातून आलेल्या स्पर्धकांमधून केवळ १० शिक्षकांची अंतिम निवड झाली. यामध्ये आंधळे यांनी दहावा क्रमांक प्राप्त केला. याबद्दल केंद्रप्रमुख अनिल राणे, मुख्याध्यापिका श्रावणी मोरे यांनी आंधळे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## प्रतिमा भेट




**रोहा : येथील नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांना स्थानिक भाजपच्या वतीने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमा भेट देण्यात आल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत शेलार, जयश्री भांड, चणेरा विभाग अध्यक्ष अतुल पाटील, उमेश शेडगे, माजी शहर अध्यक्ष यज्ञेश भांड आदी उपस्थित होते.**

# 'किवीं'विरुद्ध आता टी-२०चा थरार

## सूर्यकुमारच्या नेतृत्वात भारतीय संघ सज्ज



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांची वनडे मालिका नुकतीच पार पडली असून आता सर्वांचे लक्ष टी-२० मालिकेवर केंद्रित झाले आहे. वनडे मालिकेत भारताला न्यूझीलंडकडून १-२ असा पराभव स्वीकारावा लागला होता. त्यामुळे आता टी-२० मालिकेत या पराभवाचा बदला घेण्याची सुवर्णसंधी टीम इंडियाकडे आहे.

टी-२० मालिका २१ जानेवारीपासून सुरू होईल. विशेष म्हणजे, वनडे मालिकेत भारतीय संघाचे नेतृत्व शुभमन गिलने केले होते, मात्र टी-२० मालिकेत सूर्यकुमार यादव कर्णधार म्हणून मैदानात उतरणार आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी मैदानात उतरणारा भारतीय संघ बराच वेगळा असेल. वनडे कर्णधार गिल आणि केएल राहुल या मालिकेत खेळताना दिसणार नाहीत. श्रेयस अय्यरचा पहिल्या तीन सामन्यांसाठी संघात समावेश करण्यात आला असून तिलक वर्मा सध्या अनुपलब्ध असल्याने अय्यरला अंतिम ११मध्ये स्थान मिळण्याची दाट शक्यता आहे.

दुसरीकडे वनडे मालिकेत चमकदार कामगिरी करणारा किवी संघ सध्या फॉर्मात असून टीम इंडियासमोर त्यांचे तगडे आव्हान असणार आहे. ही मालिका २१ जानेवारी (बुधवार)पासून सुरू होईल. दुसरा सामना २३ जानेवारीला, तिसरा २५ जानेवारीला, चौथा २८ जानेवारीला आणि मालिकेतील शेवटचा थरार ३१ जानेवारीला पहायला मिळेल. हे सर्व सामने भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता सुरू होतील.

# दिवाळे कोळीवाड्यात क्रिकेट स्पर्धा रंगली



**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळे कोळीवाड्यात क्रीडारसिकांसाठी क्रिकेट स्पर्धेची रणधुमाळी पहायला मिळाली. रेंन्बो फ्रेंड सर्कल युवा सामाजिक संस्थेच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मुंबई, नवी मुंबई, ठाणे तसेच पनवेल, रायगड परिसरातील एकूण १६ संघांनी सहभाग घेतला.

अंतिम सामना पाहण्यासाठी नवी मुंबई परिसरातील क्रिकेटप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती तसेच स्पर्धेला नवनिर्वाचित नगरसेविका भारती कोळी, पूनम पाटील, सरोज पाटील, अमित पाटील यांच्यासह मिथुन पाटील, वैभव नाईक, किरण कोळी, भूषण कोळी, दर्शन कोळी, ऋषिकेश घरत, संदीप जोशी, करेश मुंबईकर, मनोज डोंगरे, समालोचक राहुल शिरसाट हजर होते.

अंतिम सामन्यात मिरांश ८ दिवाळे संघाने संयमी व दमदार खेळीचे प्रदर्शन करत अनन्या हुविका (काटई, मानोली) संघाचा पराभव केला आणि विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. उत्कृष्ट फलंदाज कंकेश कोळी, उत्कृष्ट गोलंदाज यश कोळी, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक धीरज, सामनावीर सुनील आणि मालिकावीर कंकेश कोळी यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पारितोषिक वितरणप्रसंगी अनेक खेळाडूंनी मनोगत व्यक्त करत स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल कौतुक केले.

# महिलांच्या कबड्डी स्पर्धेत पनवेल संघ विजेता



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन येथे सोमजाई कृपा क्रीडा मंडळ पर्व-२ अंतर्गत आयोजित महिलांची कबड्डी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने रूची रोशन बोरकर यांच्या पुढाकारातून भरविण्यात आलेल्या या स्पर्धेत ग्रामीण ते शहरी भागातील तब्बल १६ महिला संघांनी सहभाग घेतला.

प्रथम क्रमांक कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल, द्वितीय दत्तात्रय स्पोर्ट्स, पनवेल, तृतीय वृतिक्षा पेण आणि चतुर्थ क्रमांक सुवर्ण गणेश दिवेआगर या संघांनी पटकाविला. उत्कृष्ट चढाईपटू मल्लिका शिंदे, उत्कृष्ट पकडपटू हर्षिता चव्हाण, सर्वोत्कृष्ट खेळाडू नंदिता वाघे ठरली. विजेते संघ आणि चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी निलेश भुवड, सुयोग आगरकर, देवेश पवार, साळगावकर, बंटी दर्गे, गणेश कुडगावकर, पप्पू चांदोरकर, राकेश रटाटे, आदेश विरकूट, विरु वाणी, मेहुल खडके, अमृत बोरकर आदींनी परिश्रम घेतले. निरीक्षक म्हणून अजिंक्य पाटील यांनी काम पाहिले.

## एकाच सामन्यात विराटचे अनेक विक्रम

**नवी दिल्ली** : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसऱ्या आणि निर्णायक एकदिवसीय सामन्यात विराट कोहलीने वनडे



कारकिर्दीतील ५४व्या आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ८५व्या शतकाला गवसणी घातली. यासह त्याने भारताचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवाग आणि ऑस्ट्रेलियन दिग्गज रिकी पॉंटिंगचा विक्रम मोडीत काढला. या दोघांनी न्यूझीलंडविरुद्धच्या वनडेत प्रत्येकी सहा शतके झळकाली होती.

न्यूझीलंडविरुद्ध सर्वाधिक वनडे शतके झळकवण्यात विराट आता अव्वलस्थानी आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्व प्रकारात मिळून न्यूझीलंडविरुद्ध त्याच्या बॅटमधून निघालेले हे १०वे शतक ठरले. या यादीत त्याने जॅक कॅलिसला मागे टाकले आहे. विराटने वेगवेगळ्या ३५ मैदानात शतकांच्या विश्वविक्रमालाही गवसणी घातली. याआधी हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावे होता.



# भीमरत्न चषक क्रिकेट स्पर्धा

**माणगाव : प्रतिनिधी**

बौद्धजन पंचायत समिति तालुका शाखा माणगाव, सर्व उपशाखा आणि क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भीमरत्न चषक २०२६ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन माणगाव-मोर्बा मार्गावरील मैदानावर करण्यात आले होते. स्पर्धेच्या आयोजनाचे हे सलग दुसरे वर्ष असून या वर्षीही खेळाडू व क्रीडाप्रेमींकडून प्रतिसाद लाभला.

स्पर्धेचे उद्घाटन स्वराज्य संघटनेचे संस्थापक पंकज तांबे यांच्या हस्ते झाले. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत जिल्ह्यातील नामांकित संघ सहभागी झाले आणि चुरशीचे सामने पहायला मिळाले.

बौद्धजन पंचायत समितीचे तालुका अध्यक्ष रवींद्र मोरे, चिटणीस रघुनाथ साळवी आणि क्रीडा प्रमुख विवेक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजनाची संपूर्ण जबाबदारी पार पाडली गेली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बौद्ध समाजाचे बांधव, पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत धावीर स्पोर्ट्स रोहा संघ प्रथम



**रोहा : प्रतिनिधी**

हुतात्मा नामदेव शंकर घरत स्पोर्ट्स अकॅडमी चिर्ले (उरण)च्या वतीने आयोजित रायगड जिल्हास्तरीय प्रौढ पुरुष गटाच्या कबड्डी स्पर्धेत धावीर स्पोर्ट्स रोहा या संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

स्पर्धेत द्वितीय क्रमांक गावदेवी मुंढणी, तृतीय झुंझार कणे, चतुर्थ क्रमांक नवतरुण तरणखोप संघाने प्राप्त केला. विजेत्या संघांना पारितोषिक देण्यात आले आहे

वैयक्तिक बक्षिसांमध्ये उत्कृष्ट चढाईपटू जतीन घासे (मुंढाणी), उत्कृष्ट पक्कड बंटी बांधणकर (कणे), सर्वोत्कृष्ट खेळाडू अनिरुद्ध भोसले (रोहा) आणि पब्लिक हिरो संजोग पाटील (तरणखोप) ठरला. या सर्वांना गौरविण्यात आले.

# वेगवान विकेट्स घेण्याचा हर्षित राणाचा पराक्रम

**इंदूर : वृत्तसंस्था**

भारतीय युवा वेगवान गोलंदाज हर्षित राणाने इंदूरच्या होळकर स्टेडियमवर न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात धावांच्या बाबतीत थोडा महागडा ठरला असला, तरी त्याने एका मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. १० षटकांत ८४ धावांच्या मोबदल्यात तीन बळी घेत हर्षितने भारताच्या दिग्गज गोलंदाजांना मागे टाकत एक विशेष विक्रम आपल्या नावे केला.

हर्षित राणाने न्यूझीलंडचा सलामीवीर डेव्हन कॉनवे (५), विल यंग (३०) आणि ख्रिस्तियन क्लार्क (११) या तिघांना तंबूत धाडले. या तीन बळींसह हर्षितने एकदिवसीय कारकिर्दीतील पहिल्या १४

### दिग्गजांना टाकले मागे

सामन्यांत सर्वाधिक बळी घेणाऱ्या भारतीय गोलंदाजांच्या यादीत तिसरे स्थान पटकावले आहे. त्याने जसप्रीत बुमराह, आर. अश्विन आणि प्रसिद्ध कृष्णा यांसारख्या स्टार खेळाडूंचे रेकॉर्ड मोडीत काढले आहेत.

६ फेब्रुवारी २०२५ रोजी पदार्पण करणाऱ्या हर्षितने या मालिकेत एकूण सहा बळी घेतले आहेत. पहिल्या सामन्यात ६५ धावांत दोन बळी आणि दुसऱ्या सामन्यात ५२ धावांत एक बळी घेत त्याने आपली छाप पाडली होती. आता या मालिकेनंतर हर्षितला एकदिवसीय क्रिकेट खेळण्यासाठी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# विदर्भाने रणजी ट्रॉफी जिंकली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा फायनल खेळताना विदर्भ संघाने अखेर पहिल्यांदा या स्पर्धेच जेतेपद पटकावले आहे. सलामीवीर अथर्व तायडेची दमदार शतक आणि यश राठोडने केलेल्या अर्धशतकाच्या जोरावर पहिल्यांदा फलंदाजी करताना विदर्भ संघाने निर्धारित ५० षटकात आठ विकेट्सच्या मोबदल्यात ३१७ धावा केल्या होत्या. सौराष्ट्र संघाला हे आव्हान गाठता आले नाही.

धावांचा पाठलाग करताना सौराष्ट्र संघाच्या परेक मंकड ८८ (९२) आणि चिराग जैन ६४ (६३) यांनी अर्धशतक झळकावले, पण त्यांची ही खेळी संघाला विजयी करण्यासाठी उपयुक्त ठरली नाही.

# रोहित शर्माचे अनोखे शतक

## सचिन-विराटच्या पंक्तीत मिळविले स्थान



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि 'सुपरस्टार' फलंदाज रोहित शर्माने इंदूरमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात मैदानात पाऊल ठेवताच एक ऐतिहासिक 'शतक' साजरे केले आहे. या कामगिरीसह रोहितने सचिन तेंडुलकर आणि विराट कोहली यांसारख्या महान खेळाडूंचा समावेश असलेल्या एका विशेष क्लबमध्ये प्रवेश केला आहे.

मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये रोहित शर्माची गणना जगातील महान खेळाडूंमध्ये केली जाते. इंदूरचा हा एकदिवसीय सामना रोहितच्या कारकिर्दीतील भारतीय भूमीवर खेळला जाणारा १००वा सामना ठरला. मायदेशात १०० एकदिवसीय सामने खेळणारा रोहित हा केवळ सहावा भारतीय खेळाडू ठरला आहे. यापूर्वी हा बहुमान सचिन तेंडुलकर, मोहम्मद अझरुद्दीन, युवराज सिंग, एम.एस. धोनी आणि विराट कोहली यांनी मिळवला होता.

२०२५च्या अखेरीस दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत रोहितने धावांचा पाऊस पाडला होता, मात्र न्यूझीलंडविरुद्धच्या या मालिकेत त्याची जादू चालली नाही. या तीन सामन्यांच्या मालिकेत त्याला २०.३३च्या सरासरीने केवळ ६१ धावाच करता आल्या.

# रोहित-विराटच्या कमबॅकची करावी लागणार प्रतीक्षा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचे सामने अविरतपणे सुरू राहणार असले तरी टीम इंडियाचे दोन दिग्गज फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा हे आगामी काही महिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून लांब राहणार आहेत. या दोन्ही स्टार खेळाडूंचे मैदानावर पुनरागमन कधी होणार याकडे आता चाहत्यांचे डोळे लागले आहेत.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील वनडे मालिका रविवारी संपली. यासह विराट आणि रोहित यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळताना पाहण्यासाठी चाहत्यांना प्रतीक्षा करावी लागणार आहे. हे दोन्ही खेळाडू टीम



इंडियाच्या केवळ एकदिवसीय संघाचा भाग असल्याने आता ते विश्रांती घेतील. आगामी टी-२० मालिकेत हे दोन्ही अनुभवी खेळाडू मैदानात दिसणार नाहीत. त्यामुळे त्यांचे पुढचे आंतरराष्ट्रीय सामने कधी असतील, हा प्रश्न चाहत्यांना सतावत आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेनंतर आता उभय संघांत पाच सामन्यांची टी-२० मालिका रंगणार आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी टी-२०मधून निवृत्ती घेतल्याने ते संघाचा भाग नाहीत. यानंतर फेब्रुवारी महिन्यात आयसीसी टी-२० विश्वचषक पार पडणार असून रोहित आणि कोहली या स्पर्धेतही खेळताना दिसणार नाहीत. मार्चमध्ये विश्वचषक संपल्यानंतर लगेचच आयपीएलचा थरार सुरू होईल. आयपीएलमध्ये मात्र रोहित-विराट हे दोन्ही दिग्गज आपापल्या संघांचे प्रतिनिधित्व करताना मैदानात उतरतील.

### जुलैमध्ये आंतरराष्ट्रीय पुनरागमनाची शक्यता

*आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा विचार करता भारतीय संघ जुलै महिन्यात इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यात पाच टी-२० आणि तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवली जाईल. १ ते ११ जुलैदरम्यान टी-२० मालिका पार पडेल, ज्यामध्ये वरिष्ठ खेळाडू खेळण्याची शक्यता कमी आहे, मात्र १४ जुलैपासून सुरू होणाऱ्या एकदिवसीय मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचे मैदानावर पुनरागमन होईल, अशी दाट शक्यता आहे.*

# न्यूझीलंडच्या मिचेलचा ऐतिहासिक विक्रम



**इंदूर : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडचा मधल्या फळीतील स्टार फलंदाज डॅरिल मिचेलने क्रिकेटच्या इतिहासपुस्तकात सुवर्ण अक्षरांनी आपले नाव कोरले. भारतीय भूमीवर भारतासारख्या बलाढ्य संघाविरुद्ध सलग पाच एकदिवसीय सामन्यांत ५०हून अधिक धावांचा टप्पा ओलांडणारा तो जगातील पहिला फलंदाज ठरला आहे.

आयसीसी एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर विराजमान असलेल्या ३४ वर्षीय मिचेलने इंदूरच्या होळकर

### *भारतीय भूमीवर सलग पाच वेळा ५०+ धावा*

स्टेडियमवर सुरू असलेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात हा भीमपराक्रम केला. हॅमिल्टनच्या या उजव्या हाताच्या फलंदाजाने आपल्या प्रगल्भ फलंदाजीने भारतीय गोलंदाजांसमोर तगडे आव्हान उभे केले.

या तीन सामन्यांच्या मालिकेतील शेवटच्या सामन्यात न्यूझीलंडसाठी चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या मिचेलने २१व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर कुलदीप यादवला चौकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले. या अर्धशतकासह त्याने भारताविरुद्ध सलग पाच सामन्यांत पन्नास किंवा त्याहून अधिक धावा करण्याचा विक्रम प्रस्थापित केला.

डॅरिल मिचेलने भारतीय भूमीवर भारताविरुद्ध सलग पाच वेळा हा टप्पा ओलांडून केन विल्यमसनच्या २०१४मधील विक्रमाची बरोबरी केली आहे आणि भारतीय मैदानांवरील असा विक्रम करणारा तो एकमेव फलंदाज ठरला आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com